सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - ६८ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ गुरुवार दि. ३ एप्रिल २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## सोलापूर जिल्ह्यात 3 ठिकाणी भूकंपाचे धक्के

### शहाजी बापूंचा सांगोला केंद्रबिंदू : नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३सोलापूर**

जिल्ह्यात भूकंपाचे सौम्य धक्के जाणवले आहेत. राष्ट्रीय भूकंप विज्ञान केंद्राने ही माहिती जाहीर केली. आज सकाळी ११ वाजून २२ मिनिटांनी सोलापूर जिल्ह्यात भूकंपाचे सौम्य धक्के बसले. या भूकंपाची तीव्रता २.६ रिश्टर स्केल इतकी नोंदवण्यात आली आहे. या भूकंपाचं केंद्र जमिनीपासून ५ किमी खाली होते. सांगोला येथे भूकंपाचे केंद्रबिंदू असल्याचं पुढे आले आहे.

याआधी मंगळवारी भारतातील पूर्व भागातील कोलकाता, इंफाल येथे भूकंपाचे धक्के जाणवले. २८ मार्च रोजी नेपाळला आलेल्या भूकंपाचे धक्के बिहारच्या सिलीगुडी आणि आसपासच्या परिसरात बसले. २ एप्रिल रोजी सिक्किमच्या नामची येथे तर १ एप्रिलला लेह लडाखमध्येही भूकंपाचे धक्के बसले आहेत. ३१ मार्च रोजी अरुणाचल प्रदेशातील तवांग, शी योमी, सिक्किममधील गंगटोकमध्येही जमिनीला हादरे बसले. २९ मार्च रोजी हरियाणाच्या सोनीपत येथे भूकंपाचे धक्के जाणवले होते. इथं दुपारी २ वाजून ८ मिनिटांनी २.३ रिश्टर स्केल भूकंपाने जमीन हादरली होती.




**देशात कुठे कुठे भूकंपाचे केंद्र?**

भूवैज्ञानिकानुसार, भारतातील ५९ टक्के जमीन भूकंप क्षेत्राखाली संवेदनशील मानली जाते. भारतात भूकंप क्षेत्राला ४ भागात विभागले गेले आहे. त्यात झोन २, झोन ३, झोन ४ आणि झोन ५ नाव दिले आहे. झोन ५ सर्वाधिक संवेदनशील भाग आहे. राजधानी दिल्ली झोन ४ मध्ये येते जे चिंताजनक झोन आहे. म्हणजे इथं ७ रिश्टर स्केलहून अधिक भूंकपाचे धक्के जाणवू शकतात. जर ७ रिश्टर स्केल भूकंपाची तीव्रता असेल तर नुकसान अधिक प्रमाणात होऊ शकते.

**म्यानमारप्रमाणे भारतात विध्वंसक भूकंप येणार?**

अलीकडेच म्यानमारमध्ये ७.७ आणि ६.४ रिश्टर स्केलचे दोन भयानक भूकंप झाले. या भूकंपामुळे म्यानमारमध्ये प्रचंड विध्वंस झाला, ज्यात आतापर्यंत २ हजारांहून अधिक लोकांचा मृत्यू झाला आहे, तर हजारो लोक जखमी झाले आहेत. ३०० हून अधिक लोक अद्याप बेपत्ता असल्याची माहिती आहे. म्यानमारमधील या भूकंपाचा धक्का शेजारील देश थायलंडलाही बसला आहे. भारताच्या पश्चिम बंगालमधील सिलीगुडीमध्ये गंगा-बंगाल फॉल्ट आहे, तर म्यानमारमध्ये सागिंग फॉल्ट आहे. या दोन फॉल्टमध्ये इतर अनेक फॉल्ट लाइन्स आहेत. अशा परिस्थितीत, एक फॉल्ट सक्रिय झाल्यामुळे दुसरा फॉल्टदेखील सक्रिय होऊ शकतो आणि यामुळेच भारतातदेखील भयंकर भूकंप होण्याची शक्यता नाकारता येत नाही असा इशारा IIT कानपूरच्या शास्त्रज्ञाने दिला आहे.

## मुंबईत लॉरेन्स टोळीतील ५ जणांना अटक

### गुन्हे शाखेने ७ पिस्तूल आणि २१ जिवंत काडतुसे जप्त केली, काही सेलिब्रिटी होते लक्ष्य

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३मुंबई**

मुंबई गुन्हे शाखेने अंधेरी परिसरातून लॉरेन्स गँगच्या ५ सदस्यांना अटक केली आहे. त्यांच्याकडून ७ पिस्तूल आणि २१ जिवंत काडतूसे जप्त करण्यात आली आहेत. ही माहिती देताना पोलिसांनी सांगितले की, त्यांना संशय आहे की, एक सेलिब्रिटीला या टोळीचे लक्ष्य बनवण्यात आले होते.



गुन्हे शाखेच्या अधिकाऱ्याने सांगितले की, विशिष्ट माहितीच्या आधारे गुन्हे शाखेच्या पथकाने शनिवारी लॉरेन्स गँगच्या सदस्यांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडे शस्त्रे बाळगण्यामागील हेतू तपासला जात आहे.

विकास ठाकूर उर्फ विकी, सुमित कुमार दिलावर, श्रेयस यादव, देवेंद्र सक्सेना आणि विवेक गुप्ता अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. हे सर्वजण राजस्थान, बिहार आणि उत्तर प्रदेशचे रहिवासी आहेत. सुमित कुमार आणि विकास हे हिस्ट्रीशुटर आहेत.खरंतर, सलमान खानला लॉरेन्स गँगकडून सतत धमक्या मिळत आहेत. अशा परिस्थितीत, टोळीतील ५ जणांना अटक केल्यानंतर आणि त्यांच्याकडून शस्त्रे जप्त केल्यानंतर, सलमान खानच्या सुरक्षेसाठी हा एक मोठा धोका म्हणूनही पाहिले जात आहे.

## मोहम्मद अली जिना यांना जे जमले नाही, ते भाजपने केले

### वक्फ विधेयक मुस्लिमांच्या हिताचे तर भाजपने हिंदुत्व सोडले का? – ठाकरे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३मुंबई**

मोहम्मद अली जिना यांना जे जमले नाही, ते भाजपने करून दाखवले, अशा जहाल शब्दांत गुरुवारी उद्धव ठाकरे यांनी वक्फ सुधारणा विधेयकाबद्दल मोदी सरकारवर टीका केली. वक्फ विधेयक मुस्लिमांच्या हिताचे असेल, तर तुम्ही हिंदुत्व सोडले का, सवालही त्यांनी केला. पत्रकार परिषद घेऊन त्यांनी आपली भूमिका सविस्तर मांडली.

उद्धव ठाकरे म्हणाले की, आम्ही बिलाला विरोध केला नाही तर भाजपच्या ढोंगाला आणि भ्रष्टाचाराला विरोध केला. वक्फ बोर्ड सुधारणा विधेयकाचे आणि हिंदुत्वाचे काय देणे घेणे? असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला. तुम्ही मुसलमानांचे लांगुलचलन करत असाल तर हिंदूंनी काय केले? असा प्रश्न देखील त्यांनी उपस्थित केला.

**ईदच्या मेजवान्या झोडून वक्फ बोर्ड सुधारणा**



**विधेयक मांडले**

नुकतीच रमजान ईद झाली आहे. ईदच्या या सर्व लोकांनी मेजवान्या झोडल्या आहेत. ईदच्या मेजवान्या झोडून या लोकांनी काल वक्फ बोर्ड सुधारणा विधेयक मांडले आहे. मात्र, यामध्ये मंत्री किरण रिजिजू यांनी हे विधेयक मांडले हा योगायोग आहे. याच किरण रिजिजू यांनीच एकेकाळी गोमांस खाण्याचे समर्थन केले होते. त्यामुळे हा योगायोग घडवून आणला आहे का? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. नेमके भारतीय जनता पक्ष काय करतोय, हे देखील मला अद्याप कळाले नसल्याचे उद्धव ठाकरे यांनी म्हटले आहे.


**अमेरिकेने लादलेल्या कराचा विषय बाजूला केला**

अमेरिकेने भारतावर मोठ्या प्रमाणात शुल्क लादले आहे. मात्र हा विषय बाजूला टाकण्यासाठीच वक्फ बोर्ड विधेयक याच तारखेला जाणून बुजून आणले आहे. अशी टीका उद्धव ठाकरे यांनी केली आहे. याकडे दुर्लक्ष करण्यासाठीच हे विधेयक मांडण्यात आले असल्याचा आरोप उद्धव ठाकरे यांनी केला. काल संसदेमध्ये अमेरिकेने लादलेल्या शुल्काच्या बाबत चर्चा होणे अपेक्षीत होते. मात्र, त्यांनी जशी चर्चा केली नाही. आता आज तरी याबाबत चर्चा होणे अपेक्षित असल्याचे उद्धव ठाकरे यांनी म्हटले आहे. अमेरिकेने लादलेल्या शुल्काच्या बाबत देशाच्या पंतप्रधानांनी किंवा अर्थमंत्र्यांनी सभागृहाला अवगत करायला हवे होते, असे देखील ते म्हणाले.

## ‘सर्व न्यायाधीश त्यांची मालमत्ता सार्वजनिक करणार’, सुप्रीम कोर्ट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३नवी दिल्ली**

आता सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती त्यांची संपत्ती सार्वजनिक करणार आहेत. सर्वोच्च न्यायालयात झालेल्या न्यायाधीशांच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. सर्व न्यायमूर्ती सरन्यायाधीशांसमोर आपली संपत्ती जाहीर करतील, असा निर्णय बैठकीत घेण्यात आला. मात्र, न्यायालयाच्या संकेतस्थळावर ती जाहीर करण्याचा निर्णय ऐच्छिक असेल, असंही एकमताने




ठरवण्यात आलं आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या सर्वोच्च सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, १ एप्रिल रोजी सरन्यायाधीश संजीव खन्ना यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सर्व न्यायमूर्तींच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

१ एप्रिल रोजी झालेल्या पूर्ण न्यायालयाच्या बैठकीत सर्व ३४ न्यायमूर्तींनी भारताचे सरन्यायाधीश संजीव खन्ना यांच्या उपस्थितीत त्यांच्या संपत्तीचा खुलासा करण्याचा निर्णय घेतला आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या अधिकृत वेबसाइटवर मालमत्तांशी संबंधित तपशील अपलोड केले जातील, असेही न्यायाधीशांनी सांगितले. वास्तविक, वेबसाइटवर मालमत्तेची घोषणा ऐच्छिक असेल.

मालमत्तेची सार्वजनिक घोषणा कधी आणि कोणत्या पद्धतीने केली जाईल, हे ठरविले जात आहे. सुप्रीम कोर्टाच्या एका उच्चपदस्थ अधिकाऱ्याने सांगितले की, लवकरच ही माहिती लोकांपर्यंत पोहोचेल. न्यायाधीशांद्वारे मालमत्ता जाहीर करण्याची तरतूद अजूनही आहे, परंतु ती अनिवार्य करण्यात आलेली नाही. १ एप्रिल रोजी झालेल्या बैठकीत ठरलेला प्रस्ताव सर्वोच्च न्यायालयाच्या भावी न्यायाधीशांनाही लागू होणार असल्याचे सांगण्यात येत आहे.

## राज्यात १ मे पासून ‘एक राज्य एक नोंदणी’ ; घरात बसून करता येणार रजिस्ट्री

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३नागपूर**

घराची नोंदणी करण्यासाठी सरकारी कार्यालयांचे हेलपाटे मारून तुम्ही पण वैतागला का? तर मग ही बातमी तुमच्यासाठी आहे. घर खरेदी करणं ही बाब जितकी आनंददायी आहे, तितकंच घराची नोंदणी करण्याचं काम कंटाळवाणं वाटत. घराची नोंदणी करण्यासाठी उपनिबंधक कार्यालयामध्ये किंवा तहसील कार्यालयात चकरा माराव्या लागतात. अनेकदा तासनतास या रागांमध्ये




ताटकळत बसावं लागत. सरकारी कार्यालयाचे हेलपाटे मारून सर्वजणच वैतागतात. तर अनेक ठिकाणी आपलं काम करण्यासाठी मधल्या दलालांना पैसे देखील द्यावे लागतात, परंतु आता या सगळ्या प्रकाराला पूर्णविराम बसणार आहे.

घरांच्या नोंदणीसंदर्भात राज्य सरकारने महत्वाचा निर्णय घेतलाय. त्याची माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली आहे. चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटलंय की, ‘एक राज्य एक नोंदणी’ म्हणजे तुम्ही नागपुरात घर घेतलं असेल तर पुण्यातून देखील नोंदणी करु शकता. आधारकार्ड इन्कम टॅक्ससंदर्भात फेसलेस नोंदणी, अशी १ मे पासून सुरुवात करतोय.ता राज्यात कुठेही बसून कोणत्याही जिल्ह्यातील घरांची नोंदणी करता येणार आहे. विशेष म्हणजे ही सगळी प्रक्रिया ऑनलाइन आहे. राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी याबाबतची माहिती जाहीर केली आहे. महायुती सरकार राज्यामध्ये १ मे पासून ‘एक राज्य एक नोंदणी’ पद्धत सुरू करणार असल्याचं त्यांनी जाहीर केलंय.

घर खरेदी विक्री करताना नोंदणी करण्यासाठी सरकारी कार्यालयामध्ये जावं लागतं. या कामात दलालांचा देखील अडथळा असतो. यावर उपाय म्हणून महसूल खात्याच्या मुद्रांक निरिक्षकांनी अन् महानिरिक्षकांनी एक चांगला उपक्रम पुढे आणलाय. आपलं सरकार एक राज्य एक नोंदणी अशी पद्धत सुरू करत आहे. याअंतर्गत आता राज्यातील कोणतीही नोंदणी, मुद्रांक नोंदणी घरबसल्या करता येणार आहे.

## करे तो करे क्या, अशी उद्धव ठाकरेंची अवस्था, चंद्रशेखर बावनकुळे यांनी ठाकरेंना डिवचले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३मुंबई**

वक्फ दुरुस्ती विधेयक लोकसभेत मंजूर झालं आहे. काल रात्री उशीरा वक्फ दुरुस्ती विधेयकासाठी मतदान घेण्यात आलं. यावेळी विधेयकाच्या समर्थनात २८८ तर विरोधात २३२ मतं पडलीत. तर ठाकरेंच्या शिवसेनेने वक्फ दुरूस्ती कायद्याच्या विरोधात मतदान केले. तर ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी आज पत्रकार परिषद घेत भाजपवर जोरदार हल्लाबोल केला. अमित शाहांनी जिन्नाना लाजवेल इतकी मुस्लिमांची बाजू घेतली, भाजपने हिंदुत्व सोडलं का? आमचा विधेयकाला नव्हे तर भ्रष्टाचाराला



विरोध असल्याचे त्यांनी म्हटले. आता उद्धव ठाकरे यांच्या टीकेवर भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी पलटवार केलाय.

भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, अरे कहना क्या चाहते हो? उद्धव ठाकरे यांनी पत्रपरिषद घेऊन भूमिका मांडली, याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत. निदान ते किती संभ्रमात, एकाकी आणि खचलेल्या मनस्थितीत आहेत, याचे प्रदर्शन आम्हाला पाहायला मिळाले. संजय राऊत यांचा उद्देश साध्य झालेला आहे. तुमचे ‘संजयराऊताप्नोटिझम’ आता पूर्ण झाले आहे. एकीकडे त्यांना साधी भूमिका घेता येत नाही आणि दुसरीकडे लांगूलचालनही सोडता येत नाही. करे तो करे क्या, अशी त्यांची अवस्था झालीय. अरे कहना क्या चाहते हो? असा उच्चार तुम्ही केलात, पण नेमका हाच प्रश्न महाराष्ट्राला, ही पत्रकर परिषद ऐकल्यावर तुमच्या बाबतीत पडला आहे, असा पलटवार त्यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर केला आहे.

## दिशाच्या लॅपटॉप मध्ये सापडला सतीश सालियन यांचा व्हॉट्सअप डाटा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३मुंबई**

दिशा सालियन मृत्यू प्रकरणात आता मोठी माहिती समोर आली आहे. दिशाच्या लॅपटॉप मध्ये तिचे वडील सतीश सालियन यांचा व्हॉट्सअप डाटा मिळाल्याची माहिती समोर आली आहे. या आधीच एसआयटी चौकशी दरम्यान हा डाटा मिळाला होता. दिशाचे वडील सतीश



सालियन यांचे एका महिलेची संबंध असल्याचा दिशाला संशय होता. ती आपले व्हॉट्सअप बघते, याची तिच्या वडिलांना माहिती नव्हती. त्या महिलेला दिशाच्या वडिलांनी तीन हजार रुपये दिले होते. याबाबत दिशाने वडीलांना जाब विचारला होता. २ जून २०२० रोजी त्यांच्यात हा संवाद झाला होता. त्यानंतर ४ जूनला दिशाने घर सोडले होते. वडिलांचे घर सोडून दिशा मालाडला गेल्याचे तिच्या मित्रांनी सांगितले होते. दिशाच्या मित्रांनी देखील पोलिस चौकशीत या माहितीला दुजोरा दिला आहे.

## संपादकीय ......

# ‘ई’वाहनांना प्रोत्साहन

*इंधन जाळल्यामुळे कार्बन उत्सर्जन होऊन प्रदूषण प्रमाणाबाहेर वाढते, पर्यावरणाला मोठा धोका निर्माण होतो आणि सार्वजनिक आरोग्यावर भयंकर घातक परिणाम होतात. जैविक इंधन व पर्यायी ऊर्जा यांचा आता प्राधान्याने विचार होण्यामागचे प्रमुख कारण तेच आहे. गेल्या काही वर्षांत केंद्र सरकारने विजेवर चालणार्या वाहनांच्या, म्हणजेच इलेक्ट्रिकल वाहनांच्या मागणीत वाढ व्हावी, त्यांचा वापर वाढावा यासाठी प्रोत्साहन देण्यास सुरुवात केली आहे. २०२४-२५ च्या केंद्रीय अर्थसंकल्पात ईव्ही उद्योगातील योजनांसाठी केंद्राने ४ हजार ४३४ कोटी रुपयांची तरतूद केली होती, तर २०२५-२६ च्या अर्थसंकल्पात ५ हजार ३२२ कोटी तरतूद केली.केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी बॅटरी आणि त्यासाठी लागणार्या ३५ घटकांवरील सीमाशुल्क रद्द केले. त्याचा थेट फायदा ईव्हीच्या किमती स्वस्त होण्यास झालेला दिसतो. ईव्हीच्या बॅटरीसाठी कोबाल्ट पावडर, लिथियम इओन बॅटरी वेस्ट, लीड, झिंक या आणि अशा महत्त्वाच्या घटकांवरील प्राथमिक सीमाशुल्क रद्द करण्यात आले. ईव्हीच्या बॅटरीसाठी ज्या घटकांची आयात करावी लागते, त्यावरील आयात शुल्कातही कपात करण्यात आली. २०१९ पासून सातत्याने केंद्र सरकारने इलेक्ट्रिक वाहनांच्या प्रचारासाठी ‘फेम’ (फास्टर ॲडॉप्शन ॲंड मॅन्युफॅक्चरिंग ऑफ इलेक्ट्रिक व्हेईक) योजना सादर केली होती. याअंतर्गत कंपन्यांना कार्यक्षमतेवर आधारित प्रोत्साहन निधी देण्यात येत होता, तर इलेक्ट्रिक वाहनांची खरेदी करणार्या ग्राहकांना त्या वाहनांवर अनुदान देण्यात येत होते. ताज्या अर्थसंकल्पात केंद्राने यात बदल केला असून, ‘फेम’ योजनेत निधी देण्याऐवजी ‘पीएम इलेक्ट्रिक ड्राईव्ह रेव्होल्यूशन’ अशी नवीन योजना सादर करत, त्यात हा निधी वर्ग करण्यात आला आहे. या नव्या योजनेची व्याप्ती ही ‘फेम’ या योजनेपेक्षा जास्त आहे. येत्या सहा महिन्यांत इलेक्ट्रिक गाड्या आणि पेट्रोल गाड्यांची किंमत एकसारखीच असणार आहे, अशी घोषणा केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी नुकतीच केली.एकीकडे दर्जेदार रस्ते वेगाने बांधले जात असून, त्यामुळे भविष्यात देशातील लॉजिस्टिक्सचा खर्च कमी होईल. विद्युत ऊर्जेवरील सार्वजनिक वाहतुकीला बळ देण्यासाठी सरकार काम करताना दिसते. केंद्रातर्फे स्मार्ट शहरे आणि स्मार्ट वाहतुकीला प्राधान्य देऊन शाश्वत पायाभूत सुविधांवर भर देताना कनेक्टिव्हिटी वाढवली जात आहे. यामुळे भविष्यात इलेक्ट्रिक वाहनांचा अवलंब वाढेल. या पार्श्वभूमीवर, राज्यात इलेक्ट्रिक वाहने करमुक्त करण्याची तसेच लवकरच सर्व मंत्र्यांना व शासकीय कार्यालयांना ही वाहने उपलब्ध करून देण्याची महत्त्वाची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. सध्या राज्यात ३० लाख रुपयांपर्यंतच्या ईव्ही वाहनांवर कर आकारला जात नाही. अर्थमंत्री अजित पवार यांनी सादर केलेल्या २०२५-२६ च्या अर्थसंकल्पात ३० लाख रुपये किमतीवरील वाहनांवर सहा टक्के कर लागू केला होता, पण ३० लाखांवरील गटात सध्या कोणत्याही गाड्या बाजारात उपलब्धच नाहीत. त्यामुळे त्यातून कोणताही कर मिळण्याची शक्यता नसल्याने हा कर रद्द केला जाईल, असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. यापुढे जाऊन राज्य सरकारने ईव्ही वाहनांना उत्तेजने देण्याचे ठरवले असून, हे धोरण स्वागतार्ह आहे. तसेच आमदारांना वाहनांसाठी दिले जाणारे कर्ज हे फक्त ईव्ही गाड्यांसाठीच दिले जाणार आहे.*

*डिझेल वा पेट्रोलवर चालणार्या वाहनांसाठी कर्जाचा त्यांचा मार्ग त्यामुळे बंद झाला आहे. दुचाकी वाहनांचा वापर वाढवण्यासाठी राज्य सरकार ई-चार्जिंगचे जाळेही तयार करत आहे. एसटी महामंडळाच्या सर्व बसेस हळूहळू इलेक्ट्रिक आणि एलएनजी इंधनावर सुरू करण्याचा आराखडा निश्चित करण्यात आला आहे. एसटीसाठी ५,१५० इलेक्ट्रिक बसेसची खरेदी करण्यात येणार असून, त्यापैकी ४५० बसेस आल्याही आहेत. अर्थात, या बसेसची देखभालीची जबाबदारी आता एसटी महामंडळावर आहे. पुणे व छत्रपती संभाजीनगर येथे ईव्हीचे मोठे प्रकल्प असून, राज्यात अन्यत्रही असे प्रकल्प उभारण्याची गरज आहे. केंद्राने आतापर्यंत सुमारे ११ हजार चार्जिंग स्थानकांना मंजुरी दिली. त्यापैकी ८,८०० चार्जिंग स्थानकांची उभारणीही सुरू झाली आहे. ईव्हीसाठी लागणार्या वाहनांच्या बॅटरीच्या निर्मितीत अनेक स्थानिक कंपन्या कार्यरत आहेत. या उद्योगाला मजबुती देण्यासाठी आयातकर घटवल्यामुळे, उद्योजकांना निर्मितीसाठी चालना मिळणार आहे. इलेक्ट्रिक वाहनांच्या निर्मितीतील ४० टक्के खर्च हा बॅटरीवरचा असतो. बॅटरीवरील कर कमी झाल्यामुळे वाहनांचा एकूण उत्पादन खर्चही घटणार आहे. त्यामुळे ईव्ही वाहनांच्या किमती कमी होऊ शकतील. किमती कमी झाल्यावर त्यांचा वापर वाढणार, हे उघड आहे. ‘फेम’ योजनेवर केंद्राने भर दिल्यामुळे या योजनेंतर्गत आतापर्यंत १६ लाख ईव्ही वाहनांची खरेदी करण्यात आली आहे. मुळात कच्च्या तेलाबाबत आपले विदेशावरील अवलंबित्व वाढतच चालले आहे. जसजसा देशाचा विकास एका विशिष्ट गतीने वाढत आहे, तसतशी ऊर्जेची इंधनाची मागणीही वाढत चालली आहे.*

*२०२० मध्ये भारत ८५ टक्के कच्चे तेल आयात करत होता. आता त्यात सुमारे सव्वातीन टक्क्यांची आणखी वाढ झाली. जागतिक बाजारपेठेतील तेलाचे भाव भडकतात, तेव्हा अर्थव्यवस्थेवरील ताण वाढतो. यामुळे व्यापारी तूट रुंदावते आणि विदेशी गंगाजळीची घागर रिती होऊ लागते. रशिया, इराण, संयुक्त अरब अमिराती, कतार तसेच विविध आखाती राष्ट्रे येथून कच्चे तेल व वायू आयात केला जातो. मात्र, आयात कमी झाली, तरच पेट्रोलचा वापर कमी होईल. मगच प्रदूषण पातळी कमी करण्यासाठी जैविक इंधने, पर्यायी इंधने, इलेक्ट्रिक मोबिलिटी यासाठी प्रोत्साहन देण्याच्या सरकारी धोरणाचे ध्येय साध्य होऊ शकेल. मात्र इलेक्ट्रिक वाहनांसाठी लागणारी वीज कोळशापासूनच निर्माण होणारी असेल, तर हा सर्व खटाटोप निरर्थकच ठरेल. कारण कोळशामुळे प्रदूषण वाढते. म्हणूनच पर्यावरणपूरक वीजनिर्मितीवरच भर दिला पाहिजे. केंद्राच्या ऊर्जा धोरणाशी सुसंगत निर्णयामुळे ईव्ही उद्योगाला चालना मिळेलच, ग्राहकांनाही त्याचा काही प्रमाणात लाभ होईल.*

विदर्भ प्रजासत्ताक

# मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थींसाठी आधार पडताळणी अनिवार्य

## ३० एप्रिलपूर्वी पडताळणी करण्याचे आवाहन

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.३अमरावती-** कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभागाच्या मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेतील प्रशिक्षणार्थ्यांची आधार पडताळणी अनिवार्य करण्यात आली आहे. ज्या प्रशिक्षणार्थ्यांनी १० मार्च २०२५ पूर्वी प्रशिक्षणाचे सहा महिने पूर्ण केले आहेत, त्यांना आता उर्वरित पाच महिने प्रशिक्षण पूर्ण करण्याची संधी मिळणार आहे. यासाठी ३० एप्रिलपूर्वी कागदपत्रे पडताळणी करावी लागणार आहे.

योजनेचा लाभ घेण्यासाठी इच्छुक असणाऱ्या नविन उमेदवारांना देखील आधार पडताळणी करणे आवश्यक आहे. प्रशिक्षणार्थ्यांनी त्यांचे आधार कार्ड, शैक्षणिक पात्रता, वय, अधिवास प्रमाणपत्र आणि योजनेच्या वेबपोर्टलवरील प्रतिज्ञापत्र सादर करणे अनिवार्य आहे.

यापुढे आधार संलग्न बँक खात्यांमध्ये विद्यावेतन जमा केले जाणार आहे, त्यामुळे प्रशिक्षणार्थ्यांनी बँकखात्याला आधार लिंक करणे आवश्यक आहे. आधार पडताळणी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरच प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षणासाठी रुजू करून घेतले जाणार आहे.इच्छुक उमेदवार आणि आस्थापनांनी ३० एप्रिलपर्यंत जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, अमरावती येथे संपर्क साधून आवश्यक कागदपत्रे जमा करून पडताळणी करावी. अधिक माहितीसाठी किंवा अडचणी असल्यास, जिल्हा समन्वय अधिकारी प्रथमेश सोहळे (८४४६१५८२९७) आणि अतुल गवई (९४०४७९९९७१) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहायक आयुक्त प्रांजली बारस्कर यांनी केले आहे.

# एसटी महामंडळाचे सहा अधिकारी, कर्मचारी निलंबित

## कारवाईचा बडगा : चोर माहुली येथील शिवशाही बस जळीत प्रकरण

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३अमरावती** यवतमाळ मार्गावरील चोर माहुली गावानजिकच्या कोठोडा फाट्याजवळ शिवशाही बसच्या इंजिनच्या बोनटने अचानक पेट घेतला होता. या आगीत शिवशाही बस जळून खाक झाली होती. दरम्यान प्रकरणाच्या चौकशीअंती हलगर्जीपणाचा ठपका ठेवत येथील एसटी महामंडळाच्या सहा अधिकारी व कर्मचाऱ्यांवर निलंबनाचा बडगा उगारण्यात आला आहे. ही निलंबन कारवाई एसटी महामंडळाचे धाव विभागाचे उपअधीक्षक प्रवीण अंबुलकर आणि विभाग नियंत्रक नीलेश बेलसरे यांनी २६ मार्च रोजी केली आहे.निलंबित केलेल्या मध्ये पाळी प्रमुख राहुल बेलोकार, हरिओम इंगोले, प्रभाकर नाजूकराव राणे, यांत्रिकी विभागाचे सहायक कार्यशाळा अधीक्षक हर्षल धारणे, बसचालक विनोद ढोलवाडे व वाहक भाग्यश्री अलटकर आदी कर्मचाऱ्यावर निलंबन कारवाई केल्याची माहिती एसटी महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली. २२ मार्च रोजी अमरावती आगार क्रमांक १ ची शिवशाही बस क्रमांक एमएच ०६ बीडब्यू ०२९४ ही येथून यवतमाळकडे जात असतांना कोठोडा फाट्याजवळ बसला आग लागली होती. चालक, वाहकांनी समयसूचकता दाखवित प्रवाशांना तत्काळ बस खाली उतरविले होते.

# अवकाळी पावसात पिकांची कशी घ्याल काळजी वाचा सविस्तर




**दि.३विदर्भ प्रजासत्ताक -** वादळीवाऱ्यासह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाचा तसेच गारपीटीचा अंदाज लक्षात घेता, पिकांची कशी काळजी घ्यावी याविषयीचा कृषी सल्ला वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाने दिला आहे.प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई येथून प्राप्त झालेल्या एप्रिल महिन्याच्या सुरूवाती पासूनच छत्रपती संभाजी नगर व जालना, बीड जिल्ह्यात वादळी वारा, मेघगर्जना, विजांचा कडकडाट, वाऱ्याचा वेग अधिक (ताशी ५० ते ६० कि. मी.) राहून काही ठिकाणी हलक्या स्वरूपा च्या पावसाची तर तुरळक ठिका णी गारपीटीची शक्यता आहे.

**पीक व्यवस्थापन**

वादळीवाऱ्यासह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाचा तसेच गारपीटीचा अंदाज लक्षात घेता, मळणी केलेल्या मालाची सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी. मळणी केलेला माल पावसात भिजणार नाही याची दक्षता घ्यावी.

**गहू :** वादळीवाऱ्यासह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाचा तसेच गारपीटीचा अंदाज लक्षात घेता, मळणी न केलेल्या व मळणीस तयार असलेल्या गहू पिकाची लवकरात लवकर मळणी करावी. मळणी करणे शक्य नसल्यास काढणी केलेला माल ताडपत्रीने झाकून ठेवावा. मळणी केलेला माल पावसात भिजणार नाही याची दक्षता घ्यावी.

**हळद :** सध्या हळदीची काढणी सुरु आहे. काढणी केलेल्या हळदीची उघड्यावर साठवण करू नये. काढणी केलेल्या मालाची सुरक्षित ठिकाणी (गोदामात) साठवणूक करावी.

**उन्हाळी भुईमूग :** उन्हाळी भुईमूग पिकात आवश्यकतेनुसार तुषार सिंचन पध्दतीने पाणी व्यवस्थापन करावे. उन्हाळी भुईमुग पिकात रसशोषण करणाऱ्या (मावा, तुडतुडे, फुलकीडे व पांढरी माशी) किडींना आकर्षित करण्यासाठी एकरी १० ते १२ पिवळे व निळे चिकट सापळे लावावेत व तंबाखुवरील पाने खाणाऱ्या अळीचे व लाल केसाळ अळीचे समुहातील अंडी लहान अळ्या हाताने वेचून नष्ट कराव्यात.उन्हाळी भुईमूग पिकात रसशोषण करणाऱ्या किडींचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास याच्या व्यवस्थापनासाठी ५% निंबोळी अर्काची किंवा झाडिरेक्टिन (३० पीपीएम) ३ मिली प्रति लिटर पाण्यात मिसळून पावसाची उघडीप बघून फवारणी करावी.

**फळबागेचे व्यवस्थापन**

केळी : वादळीवाऱ्यासह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाचा तसेच गारपीटीचा अंदाज लक्षात घेता, घड लागलेल्या केळी झाडांना काठीने आधार द्यावा. काढणीस तयार असलेल्या केळीच्या घडांची काढणी लवकरात लवकर करून घ्यावी. केळी बागेस आवश्यकतेनुसार सरी वरंब्याने पाणी द्यावे.जमिनीतील ओलावा टिकून राहण्यासाठी व जमिनीचे तापमान संतुलित राहण्यासाठी केळी फळझाडाच्या आळ्यात आच्छादन करावे. नविन लागवड केलेल्या केळीच्या रोपांचे उन्हापासून संरक्षण करण्यासाठी रोपांना सावली करावी.

**आंबा :** काढणीस तयार असलेल्या आंबा फळांची काढणी लवकरात लवकर करून घ्यावी. आंबा बागेत आवश्यकतेनुसार पाणी व्यवस्थापन करावे. जमिनीतील ओलावा टिकून राहण्यासाठी व जमिनीचे तापमान संतुलित राहण्यासाठी आंबा फळझाडाच्या आळयात आच्छादन करावे. नविन लागवड केलेल्या आंब्याच्या रोपांचे उन्हापासून संरक्षण करण्यासाठी रोपांना सावली करावी. आंबा बागेत ००:००:५० १५ ग्रॅम प्रति लिटर पाण्यात मिसळून पावसाची उघडीप बघून फवारणी करावी.

द्राक्ष : काढणी राहिलेल्या द्राक्ष फळांची काढणी करून घ्यावी. द्राक्ष बागेत एप्रिल छाटणीची पुर्व तयारी करून घ्यावी.


**भाजीपाला-** वादळी वाऱ्यासह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाचा तसेच गारपीटीचा अंदाज लक्षात घेता, काढणीस तयार असलेल्या भाजीपाला, टरबूज, खरबूज पिकांची काढणी करून घ्यावी. भाजीपाला पिकात खुरपणी करून भाजीपाला पिक तण विरहीत ठेवावे. नविन लागवड व पुर्नलागवड केलेल्या रोपांना आवश्यकतेनुसार पाणी व्यवस्थापन करावे.भाजीपाला ( मिरची, वांगे व भेंडी) पिकात रसशोषण करणाऱ्या किडीचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास त्याच्या व्यस्थापनासाठी पायरीप्रॉक्सीफेन ५% + फेनप्रोपाथ्रीन १५% १० मिली किंवा डायमेथोएट ३०% १३ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

**फुलशेती-** फुल पिकात खुरपणी करून फुल पिक तण विरहीत ठेवावे. काढणीस तयार असलेल्या फुलांची काढणी करून बाजारपेठेत पाठवावी.

(सौजन्य: मुख्य प्रकल्प समन्वयक, ग्रामीण कृषी मौसम सेवा,वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी)




# योग आणि प्राणायाम: शारीरिक तसेच मानसिक शांतीचा मार्ग



**दि.३विदर्भ प्रजासत्ताक**

नियमित व्यायाम केल्याने शरीर निरोगी, तंदुरुस्त आणि सुदृढ राहते. व्यायामामुळे शारीरिक तसेच मानसिक आरोग्य सुधारते. विविध प्रकारचे व्यायाम आहेत. आपल्या शरीरासाठी योग्य व्यायाम निवडून नियमितपणे त्याचे पालन करा.

नियमित व्यायाम केल्यान मन प्रसन्न राहते. खालीलप्रमाणे व्यायामाचे विविध फायदे आहेत. शारीरिक, मानसिक आणि भावनिक आरोग्य सुधारण्यासाठी दररोज किमान ३० मिनिटे व्यायाम करणे आवश्यक आहे. निरोगी जीवनशैलीसाठी योग्य आहार, पुरेशी झोप आणि शारीरिक यांचे संतुलन गरजेचे आहे.

योगासन - शरीर आणि मन शांत ठेवण्यासाठी उत्तम. सूर्यनमस्कार, ताडासन, आणि भुजंगासन यासारखी आसने नियमित करावीत.

प्राणायाम - श्वसनाचे व्यायाम तणाव कमी करतात आणि फुफ्फुसांची क्षमता वाढवतात.

धावणे - हृदयासाठी उत्तम आणि कॅलरी बर्न करण्यासाठी प्रभावी.

सायकलिंग -पायांच्या स्नायूंना मजबूती देण्यास आणि वजन कमी करण्यास मदत करते.

पोहणे - संपूर्ण शरीराचा व्यायाम, स्नायूंची ताकद वाढवते आणि सांध्यांवरील ताण कमी करते.

वजन उचलणे - स्नायूंची ताकद वाढवण्यासाठी आणि चयापचय सुधारण्यासाठी.

जॉगिंग - हृदय व रक्तवाहिनीसंबंधी आरोग्यासाठी आणि फिटनेससाठी उपयुक्त.

जंप रोप - हृदयाचे आरोग्य सुधारते आणि कॅलरी जलद बर्न करते.

नियमित व्यायामासोबत संतुलित आहार आणि पुरेशी झोप देखील महत्वाची आहे. काही आवडते व्यायाम प्रकार आहेत का?

व्यायाम करताना घ्यायची काळजी:

वॉर्म-अप आणि कूल-डाउन: स्नायूंना तयार करण्यासाठी गरम करणे आवश्यक आहे.

पुरेशी झोप: व्यायामानंतर शरीराला आराम मिळावा.

संतुलित आहार: पोषणयुक्त आहार घेतल्याने ऊर्जा मिळते.

पुरेशी पाणी प्या: निर्जलीकरण टाळा.

शरीराची मर्यादा ओळखा: जास्त ताण देऊ नका.

# महाडीबीटी शिष्यवृत्ती अर्जासाठी मुदतवाढ

## ३० मे पर्यंत अर्ज सादर करण्याचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३ अमरावती-** अमरावती, सामाजिक न्याय विभागाने अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाची घोषणा केली आहे. महाडीबीटी प्रणालीवर चालविल्या जाणाऱ्या विविध शिष्यवृत्ती योजनांसाठी अर्ज करण्याची अंतिम मुदत वाढवण्यात आली आहे. सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षाकरिता नवीन अर्ज तसेच नूतनीकरणाचे अर्ज भरण्याची अंतिम तारीख आता ३० मे २०२५ असणार आहे. यासोबतच, सन २०२३-२४ या वर्षातील ज्या विद्यार्थ्यांचे अर्ज त्रुटींमुळे परत पाठवण्यात आले होते, त्यांना पुन्हा (Re--pply) अर्ज करण्यासाठी देखील ३० मे २०२५ पर्यंतची मुदत देण्यात आली आहे.

समाज कल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त राजेंद्र जाधवर यांनी जिल्ह्यातील सर्व विद्यार्थी आणि महाविद्यालयांना आवाहन केले आहे की, त्यांनी या मुदतवाढीचा लाभ घ्यावा. ज्या विद्यार्थ्यांचे अर्ज त्रुटींमुळे महाविद्यालयांनी परत पाठवले आहेत, त्यांनी त्वरित त्या त्रुटींची पूर्तता करून आपले अर्ज पुन्हा जिल्हा लॉगिनवर पाठवावेत.

महाडीबीटी पोर्टल https://mahadbtmahait.gov.inया संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू आहे. सर्व संस्था आणि महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी याची नोंद घ्यावी आणि त्यांच्या संस्थेतील पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज वेळेत भरून घेण्याची जबाबदारी त्यांची असेल, असे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत.

सामाजिक न्याय विभागामार्फत अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती, शिक्षण फी परीक्षा फी योजना, राजश्री शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती, व्यावसायिक पाठ्यक्रमांशी संलग्न वस्तीगृहातील विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता, व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना या शिष्यवृत्ती योजना राबविल्या जातात.

जिल्ह्यातील अधिकाधिक विद्यार्थ्यांनी या शिष्यवृत्ती योजनांचा लाभ घ्यावा आणि आपली शैक्षणिक प्रगती साधावी, असे आवाहन करण्यात आले आहे.-

RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

गुरुवार दि. ३ एप्रिल २०२५ — शहर/ग्रामिण



# महसूलमंत्र्यांच्या नावे बनावट लेटरहेडवर जिल्हाधिकाऱ्यांना पत्र

## एका वरिष्ठ लिपिकावर कारवाई करण्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.३अमरावती** – राज्याचे महसूल मंत्री तसेच अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या नावाने एका अज्ञात व्यक्तीने बनावट लेटरहेड व त्यांची बनावट स्वाक्षरी करून एका वरिष्ठ लिपिकावर कारवाई करण्याचे पत्र जिल्हाधिकाऱ्यांना पाठवल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे.जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी हे पत्र तपासले, त्यातील मजकुरावरून त्यांना संशय आला. लेटरहेडसह पालकमंत्री व महसूल मंत्र्यांची सही देखील बनावट असल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यातून हा धक्कादायक प्रकार उघडकीस आला.

या प्रकरणी संबंधित अज्ञात व्यक्तीच्या विरोधात पोलीस आयुक्त कार्यालयात तक्रार दाखल करण्यात आली. गाडगेनगर पोलिसांनीगुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे. एका अज्ञात व्यक्तीने महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या नावाने अमरावतीच्याजिल्हाधिकाऱ्यांना एक पत्र पाठवले. मोर्शी येथील एका वरिष्ठ लिपिकावर कारवाई करण्यासंदर्भात हे पत्र आहे. हे पत्र



बनावट स्वाक्षरीसह लेटरहेडवर दिले.टपालाद्वारे हे बनावट पत्र पाठवण्यात आले होते. हा प्रकार समोर येताच पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे विशेष कार्यकारी अधिकारी योगेश कोठेकर यांनी तत्काळ पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांच्याशी संपर्क साधून सविस्तर चर्चा केली आणि लेटरहेड व त्यावरील स्वाक्षरी बनावट असल्याचे स्पष्ट केले. संबंधित अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा नोंदवून त्याचा शोध घेण्याचे आदेश यावेळी पोलिस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांनी दिले. हे बनावट पत्र १९ मार्च रोजी जिल्हाधिकारी कार्यालयाला प्राप्त झाले होते. त्यात वरूड नगर पालिकेतील एका लिपिकावर कारवाई करण्याचे सांगण्यात आले आहे. या लिपिकाने वरिष्ठांच्या वरदहस्ताने जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नगर पालिका विभागात प्रतिनियुक्तीवर परस्पर नेमणूक मिळवली, असा उल्लेख त्यात होता.

# जिल्ह्यात ब वर्गातील पाच सेवा सहकारी संस्थांची ११ मे रोजी निवडणूक

## आजपासून नामनिर्देशनपत्र स्वीकारणार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३अमरावती** – जिल्ह्यातील पाच ब वर्ग सहकारी संस्थांच्या व्यवस्थापक समितींचा २०२५–२०३० वर्षाकरिता निवडणूक कार्यक्रम जाहिर करण्यात आला आहे. ११ मे रोजी निवडणूक तर त्याच दिवशी मतमोजणी होणार आहे. याकरिता ३ ते ९ एप्रिलदरम्यान नामनिर्देशनपत्र स्वीकारले जाणार आहे.



मुदत संपणाऱ्या सेवा सहकारी सोसायटींच्या निवडणूका टप्याटप्यात घेतल्या जात आहेत. अशातच जिल्ह्यातील पाच सेवा सहकारी संस्थेच्या निवडणूका जाहीर झालेल्या आहेत. यामध्ये निभा सेवा संस्था भातकुली, नांदुरा बु. सेवा सहकारी संस्था, अमरावती, नांदगाव पेठ विविध कार्यकारी सेवा संस्था, अमरावती, जळका हिरापुर सेवा संस्था, भातकुली व पुर्णानगर सेवा संस्था मर्या,भातकुली या सेवा सहकारी संस्थांचा समावेश आहे. सहकार विभागाने निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची घोषणा केली आहे. यामध्ये निंभा सेवा सहकारी संस्थेकरिता जिल्हा उपनिबंधक कार्यालयातील वरीष्ठ लिपीक सुमेध पाटील तसेच नांदूरा सेवा सहकारी संस्थेत उपनिबंधक सहकारी कार्यालयातील यु. डी. मोहड, नांदगाव पेठ संस्थेकरिता अविनाश महल्ले, जळका हिरापुर संस्थेत सहाय्यक सहकार अधिकारी व्ही.डी. शेळके व पुर्णानगर सेवा सहकारी संस्थेत निवडणुक निर्णय अधिकारी म्हणून ऐ. एस. खान यांची नियुक्ती केली आहे. या संस्थेत व्यवस्थापन समिती सदस्यांकरिता ३ ते ९ एप्रिलदरम्यान नामनिर्देशन पत्रे पुरविणे व दाखल प्रकिया सकाळी ११ ते दुपारी ३ वाजतापर्यंत केली जाणार आहे.प्राप्त नामनिर्देशन पत्राची छाननी ११ एप्रिलला करण्यात येईल. १५ ला यादी प्रसिध्द केल्यानंतर २९ एप्रिलपर्यंत अर्ज मागे घेण्याची संधी दिली जाईल. त्याच दिवशी निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द केली जाईल. २ मे रोजी उमेदवारांना चिन्ह वाटपानंतर ११ मे रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ वाजतादरम्यान मतदान होईल. मतदानानंतर त्याच दिवशी मतमोजणी केली जाणार आहे.

# विधानसभा निवडणूक प्रकरणी नागपूर खंडपीठात सुनावणी

## आ. राजेश वानखडे आणि आ. प्रकाश भारसाकळे यांना समन्स

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३अमरावती**

विधानसभेच्या निवडणुकीत अनेक दिग्गज नेत्यांना पराभवाचा धक्का बसला असून त्याविरोधात काहींच्या मनात अद्यापही शंका आहे. तर निवडणूक मॅनेज केल्याची शंका काहींच्या मनात आहे. याच शंकेतून कॉंग्रेसच्या नेत्या आणि माजी मंत्री यशोमती ठाकूर आणि आकोट विधानसभा मतदारसंघातील कॉंग्रेसचे पराभूतउमेदवार मनीष गणगणे यांनी कोर्टात धाव घेतली आहे.





तर त्यांनी दाखल केलेल्या याचिकेवर मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात सुनावणी होणार आहे. या याचिकेवर खंडपीठाने तिवसा मतदारसंघाचे भाजपचे आमदार राजेश वानखडे आणि आकोटचे आमदार प्रकाश भारसाकळे यांना समन्स बजावले आहेत.–

# आमदार प्रवीण तायडे यांच्या हस्ते पाच नवीन 'लालपरी' चे उद्घाटन

## एस टी बस चालवीत आमदारांनी घेतला अनुभव

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३परतवाडा** – महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ ही वाहतूक सार्वजनिक वाहतूक सेवा देणारी व्यवस्था आहे. राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी खाते स्वीकारल्यानंतर राज्यातील सर्व जिल्ह्यांना 'अशोक लेलँड' द्वारे उत्पादित 'लालपरी' पुरविली जात आहेत. बुधवारी, जिल्ह्यातील दुसऱ्या क्रमांकाच्या परतवाडा आगारामध्ये पाच 'लालपरी' पोहोचल्या. त्यांचे उद्घाटन आमदार प्रवीण तायडे यांच्या हस्ते झाले. विशेष म्हणजे आमदार प्रवीण तायडे यांनी केवळ रिबन कापून या बसेसचे उद्घाटन केले नाही. त्यांनी 'लाल परी'चे स्टेअरिंग हातात घेऊन 'ड्रायव्हर' म्हणून प्रवाश्यांना एसटीने सफारीवर नेले.

बुधवारी सकाळी ११.४५ वाजता स्थानिक परतवाडा आगारात आमदार प्रवीण तायडे यांच्या उपस्थितीत 'लालपरी'ची विधीनुसार पूजा करण्यात आली. आमदार आणि इतर मान्यवरांच्या उपस्थितीत, दीपप्रज्वलन करून आणि रिबन कापून या वाहनांचे लोकार्पण करण्यात आले. यावेळी आमदार प्रवीण तायडे एवढ्यावरच थांबले नाहीत. चला एसटी बस चालवण्याचा प्रयत्न करूया... असे म्हणत त्यांनी ड्रायव्हर सीटचा दरवाजा उघडला आणि आत चढू लागले, ज्याने तिथे उपस्थित असलेले एसटी अधिकारी आणि कर्मचारी आश्चर्यचकित झाले. सर्वांना वाटले की, हे फक्त फोटो सेशन असेल, परंतु आमदार तायडे यांनी हे सर्व खोटे ठरवले आणि तिथे उपस्थित असलेल्या एसटी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना गाडीच्या चाव्या आणि ती कशी चालवायची हे विचारले.नवीन 'लाल परी' बसमध्ये बसणाऱ्या एका चालकाच्या मार्गदर्शनाखाली, त्याने बसचे स्टीअरिंग हातात घेतले आणि गाडी डेपो परिसरात फिरवली. हे पाहून सर्वांनाच आश्चर्य वाटले. सरकारी वाहनाच्या स्टेअरिंगवर आमदार बसलेले पाहून तिथे उपस्थित असलेले प्रवासीही थक्कझाले. पण दुसरीकडे, त्यांच्या मनात 'आमदार प्रवीण तायडे हे देखील आपल्यापैकीच एक आहेत...' अशी भावना स्पष्ट दिसत होती. उद्घाटन समारंभानंतर आमदार तायडे यांनी सर्वांना भेटून स्थानिकांशी संवाद साधला. परिसर पाहताना त्यांनी तेथील व्यवस्थेचा आढावा घेतला. यावेळी परतवाडा आगाराचे व्यवस्थापक जीवन वानखडे, विभागीय तांत्रिक अभियंता धावडे, विभागीय वाहतूक निरीक्षक योगेश ठाकरे, कष्टकरी जनसंघ परतवाडा अध्यक्ष चित्तेशसिंग रघुवंशी, वाहतूक नियम निरीक्षक जयदीप घोडे, कास्तकरी जनसंघाचे विभागीय कार्याध्यक्ष सतीश कडू पाटील, परतवाडा आगाराचे अधिकारीउपस्थित होते.





परतवाडा गोदाम कार्यशाळेचे अधीक्षक चोरमुले, अचलपूर शहर विभाग अध्यक्ष कुंदन यादव, ग्रामीण अध्यक्ष विशाल काकड, सरचिटणीस शंकर बसानी, प्रवीण तोंडगावकर, रूपेश ढेपे, रवी खंडेलवाल, वीरेंद्र उदापूरकर, युवा मोर्चा सरचिटणीस गौरव रघुवंशी, निलेश पवार, महेश पवार, सपत्नीक देवळे, सुप्रसिद्ध पाटील आदी उपस्थित होते. सावरकर, मयंक शर्मा, मयूर वर्मा, पूरब खंडेलवाल, कृष्णा तिवारी यांच्यासह एसटी महामंडळ परतवाडा आगारातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या संपूर्ण कार्यक्रमाच्या तयारीत आणि नियोजनात कंडक्टर रूपाली घोडे यांनी विशेष सहकार्य केले.

# रविवारी रन फॉर होमिओपॅथीडॉ. सॅम्युअल हॅनिमन यांच्या जयंतीनिमित्त सिम्पथी इन्स्टिट्यूटचे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३अमरावती**– सिम्पथी इन्स्टिटच्यूट ऑफ होमिओपॅथी फार्मसी ॲण्ड पॅरामेडिकल सायन्स व महाराष्ट्र डॉक्टर होमिओपॅथिक असोसिएशन आणि होमिओपॅथिक फार्मसी असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने होमिओपॅथीचे जनक डॉ. हॅनिमन यांच्या २७० व्या जयंतीनिमित्त रविवार ६ एप्रिल रोजी एचव्हीपीएम येथे रन फॉर होमिओपॅथीचे आयोजन केले आहे, अशी माहिती आयोजकांनी बुधवारी पत्रपरिषदेत दिली.

रन फॉर होमिओपॅथी ही स्पर्धा तीन गटात होईल. प्रथम गट अठरा वर्षाखालील घावकांसाठी, द्वितीय गट १८ ते ५० वर्ष, व तिसरा गट ५० वर्षांवरील स्त्री–पुरुषांसाठी आहे. हनुमान व्यायाम प्रसारक मंडळातून सहा एप्रिल रोजी सकाळी सहा वाजून तीस मिनिटांनी या घाव स्पर्धेला सुरुवात होणार आहे. १८ वर्षांखालील धावकांसाठी पाच किलोमीटर अंतर तर अठरा ते पन्नास वयोगटातील धावपटूंसाठी पाच किलोमीटर अंतर आणि ५० वर्षांवरील स्पर्धकांसाठी दोन किलोमीटरचे अंतर ठरवण्यात आले आहे. या स्पर्धेला एचपीपीएममधून



सुरुवात झाल्यानंतर एचव्हीपीएम चौक, पारवानी हॉस्पिटल, मनस्वी डायग्नोस्टिक सेंटर, पन्नालाल बगीच्या, प्रभात कॉलनी चौक, उजवीकडे भूतेश्वर चौक, एचपीपीएम मेन गेट कडे, एचपीपीएम ग्राउंड ट्रॅक, दोन राउंड पूर्ण करून ही स्पर्धा पूर्ण होईल. तसेच दोन किलोमीटर अंतर असणाऱ्या पन्नास वर्षावरील स्पर्धकांसाठी एचपीपीएम चौक, एकविरा मंगल कार्यालयाकडून उजव्या बाजूने डॉ. पाठक मार्ग,स्वामी समर्थ मंदिराकडून उजव्या बाजूने सरळ एचपीपीएम मेन गेटकडे, पुढे एचपीपीएम ग्राउंड ट्रॅकवर एक राउंड पूर्ण होऊन ही स्पर्धा पूर्ण होईल, या स्पर्धेचे उद्घाटन जिल्हाधिकारी सौरभ कटियार, विदर्भ युथ वेल्फेअर सोसायटीचे अध्यक्ष डॉ. नितीन धांडे, संत गाडगेबाबा विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. अविनाश असणारे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित राहतील.या स्पर्धेत २२५ लोकांनी सहभाग नोंदविला आहे. विजेत्या स्पर्धकांना स्मृतीचिन्ह व रोख पारितोषिक देण्यात येईल, असे यावेळी सांगण्यात आले. पत्र परिषदेला सिंपथी इन्स्टिट्यूटचे डॉ. संतोष चिंचोळकर यांच्यासह डॉ. अशोक उमप, डॉ. विपुल भट्ट, शुभम गावंडे, स्नेहा शर्मा, केतकी पालेकर आदी उपस्थित होते.–

# 'वकील आपल्या दारी' उपक्रमाचे आयोजन

## गरजूंना मिळणार मोफत कायदेशीर सल्ला

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३अमरावती** – जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, दर्द से हमदर्द तक ट्रस्ट आणि जिल्हा वकील संघ यांच्या संयुक्त विद्यमाने विधी सेवा सदन येथे 'वकील आपल्या दारी' या उपक्रमाचे नुकतेच आयोजन करण्यात आले. संस्थेचे संस्थापक, मुंबई उच्च न्यायालयाचे ॲड. प्रकाश साळसिंगीकर यांच्या मार्गदर्शनाखाली 'दर्द से हमदर्द तक' ट्रस्ट गेल्या ३ वर्षांपासून संपूर्ण राज्यभर गरजूंना मोफत कायदेशीर सल्ला देण्याचे काम करीत आहे. संस्थेचे कार्य मुंबई आणि पुणे शहरांमध्ये विशेष प्रभावी आहे.

राज्यात वकील आपल्या दारी या उपक्रमाच्या माध्यमातून गरजूंना कायदेशीरसाहाय्य पुरवले जाणार आहे. या उपक्रमाचे उद्घाटन राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते नुकतेच झाले. या उपक्रमांतर्गत, एक विशेष वाहन विदर्भातील विविध जिल्ह्यांमध्ये फिरून लोकांना मोफत कायदेशीर सल्ला देणार आहे. 'लिगल अॅड ऑन व्हील्स' या उपक्रमाद्वारे वकील आणि स्वयंसेवक विविध ठिकाणी



जाऊन लोकांना कायदेशीर साहाय्य आणि मार्गदर्शन करतील.अतिरिक्त पोलीस अधीक्षक पंकज कुमावत, प्रमुख जिल्हा न्यायाधीश सुधाकरवे. यार्लगड्डा, कारागृह अधीक्षक कीर्ती चिंतामणी, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सचिव मंगला कांबळे, वकील संघाचे अध्यक्ष ॲड. विश्वास काळे, ॲड. प्रद्युम्न भिरंगी, न्यायरक्षक कार्यालयाचे प्रमुख अधिवक्ता ॲड. जितेंद्र देशमुख, दर्द से हमदर्द तक संस्थेचे विदर्भ प्रमुख ॲड. विभव दीक्षित, पुणे जिल्हा सत्र न्यायालयाचे ॲड. संकेत राव आदी यावेळी उपस्थित होते.दर्द से हमदर्द तक संस्थेचे विदर्भ प्रमुख ॲड. दीक्षित आणि ॲड. संकेत राव यांनी 'लिगल ॲड ऑन व्हील्स' उपक्रमाची आणि संस्थेची माहिती दिली. श्रीमती कांबळे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि आभार प्रदर्शन केले.

# आरोग्य यंत्रणांनी मानकांनुसार कार्य करावे– जिल्हाधिकारी सौरभ कटियार

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.३अमरावती,** जिल्ह्यात आरोग्यविषयक चांगले कार्य होत आहे. यात आता क्षयरोगमुक्त आणि आयुष्मान कार्ड वाटपात गती देण्याची गरज आहे. त्यासोबतच जिल्ह्यासाठी असलेल्या मानकानुसार आरोग्य यंत्रणांनी कार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी केले. जिल्हा एड्स प्रतिबंध आणि नियंत्रण समितीची सभा जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडली. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी संजीता महापात्र, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दिलीप सौंदळे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुरेश असोले, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक अजय साखरे यांच्यासह स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.



जिल्हाधिकारी श्री. कटियार यांनी, राज्य शासनाच्या निर्देशानुसार एचआयव्हीबाधितांना परिवहन महामंडळाच्या बसेसच्या पासेसचे वितरण करण्यात येत आहे. त्या सर्वांना मिळत असल्याची खात्री करावी. त्यासोबतच इतरही योजनांचा लाभ देण्यासाठी प्रयत्न करण्यात यावेत. रक्तनमुने तपासणी करून एचआयव्हीबाधितांचा शोध घेण्यात येत आहे. यात आढलेल्या सर्वांना जोडून त्यांच्यावर उपचार करण्यात यावेत. जिल्ह्यात धामणगावसह काही तालुक्यात मुलींचे प्रमाण कमी आहे. त्यामुळे लिंग गुणोत्तर कमी असणाऱ्या तालुक्यात गर्भधारणापूर्व आणि प्रसवपूर्व निदान तंत्र (लिंग निवड प्रतिबंध) अधिनियमाची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी. प्रामुख्याने सोनोग्राफी केंद्रावर लक्ष ठेवण्यात यावे. कायद्याचा वचक राहावा यासाठी कारवाई यशस्वी व्हावी. मुलींच्या जन्माचे स्वागत होण्यासाठी जनजागृती करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी श्री. कटियार यांनी दिले.

# राष्ट्र निर्मितीसाठी संघटन वाढवा- भिकाभाई पटेल

## राज्य शिक्षक परिषदेच्या आढावा बैठकीत कर्तुत्ववान महिलांचा सन्मान

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३अमरावती–** राष्ट्र निर्मितीसाठी व नवीन पिढी तयार करण्यासाठी चांगले संघटन तयार करून निर्माते व्हा असे आवाहन अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षिक महासंघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष भिकाभाई पटेल यांनी केले. महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेच्या आढावा बैठकीत मुख्य अतिथी म्हणून ते बोलत होते.येथील समुत्कर्ष भवण संघ कार्यालय राजापेठ अमरावती येथे अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षिक महासंघ संलग्नित महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद प्राथमिक विभाग अमरावती विभागाची आढावा बैठक अ. भा. रा.महासंघ राष्ट्रिय उपाध्यक्ष भिकाभाई पटेल गुजरात यांच्या प्रमुख उपस्थितीत



प्रांतअध्यक्ष मधुकर उन्हाळे , प्रांतकार्यवाह पुरुषोत्तम काळे यांच्या उपस्थितीत , श्रीमती वंदनाताई विंचूरकर जेष्ठ कवियीत्री यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. यावेळी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती निमित्त प्राचार्य डॉ श्रीमती स्मिता देशमुख यांचे जाहीर व्याख्यान आणि कर्तृत्ववान महिलांचा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला.यामध्ये जिल्हायातील कर्तृत्ववान शिक्षक महिला प्रा.डॉ वनिता काळे , वैशाली ढाकुलकर, शितल देशमुख, प्रतिभा काठोळे, जयश्री शेकार, वैशाली परतीके, श्रीमती शारदा सरोदे, देवकी अवघड यांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाला विभाग कार्यवाहक सुमित पवार, प्रांत उपाध्यक्ष,अवधूत वानखडे, विठ्ठलराव महाले, विभागीय सचिव किशोर तळोकार, महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे सचिव सुनील वाघमोडे, कार्याध्यक्ष ओंकार तीवडकर, कोषाध्यक्ष उज्वल सुमकुरवार, संघटक बालाजी केंद्रे, दीपक जोशी, साबळे यांच्यासह विविध जिल्ह्याचे जिल्हाध्यक्ष सचिव पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जिल्हा महीला आघाडी प्रमुख श्रीमती वैशाली गरकल यांनी केले, प्रास्ताविक जिल्हाध्यक्ष श्री रवी घवळे यांनी केले तर आभार प्रदर्शन विभागीय अध्यक्ष श्री धनराज कांदे यानी केले कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रवी घवळे, धनराज कांदे , वैशाली गरकल, ज्योती सानप, दर्शन गंधे , वर्षा भांदर्गे , योगेश्वर काठोडे , प्रविण डवके , प्रवीण खैरकर,माया थोरवे यांनी परिश्रम घेतले.

# रस्त्याने लुटमार करणाऱ्या अल्पवयीनसह चार जणांना बेड्या

## गुन्हेशाखेच्या युनिट दोनची कारवाई



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३अमरावती** –रस्त्याने जाणाऱ्या युवकांना मारहाण करून लुटणाऱ्या एका अल्पवयीनसह चार युवकांना युनिट दोनच्या पथकाने अटक करून मुद्देमाल जप्त केला. परंतु तीन युवक अद्यापही पसार असल्यामुळे पोलीस त्यांच्या शोधात आहेत. हेमंत ओमकार पेठकर (वय १९ रा. बुधवारा), रोहीत विनोद शेरेकर (वय २०, रा. माता खिड़की), रोहन वासुदेवराव नाईक (वय २४, रा. खडकाडीपुरा) आणि कृष्णा मंगेश कलाने (वय १९, रा. औरंगपुरा) – अशी अटकेतील लुटारुंची नावे आहेत.

बुधवारा परिसरात राहणारा वेदांत गिरीश मानमोडे (वय १९) व त्याचा मित्र संस्कार साहू हे दोघे २८ मार्चला मोपेड दुचाकीने राजेंद्र गोडे महाविद्यालय जवळून जात होते. तेव्हा चार मोटार सायकलवर ५ ते ६ युवक आले आणि त्यांच्या मोपेड दुचाकीला धडक दिली. त्यामुळे दोघेही दुचाकीवरून खाली पडले. तेव्हा एका युवकाने जवळील चाकू काढून संस्कार साहूवर २ ते ३ वार केले आणि त्याच्या ताब्यातील २ लाख ६० हजार रुपयांचा कॅमेरा हिसकावून निघून गेले. घटनेनंतर वेदांतने फ्रेजरपुरा ठाण्यात तक्रारदिली. त्या आधारावर पोलिसांनी गुन्हा दाखल करून लुटारूंचा शोध सुरु केला. या प्रकरणात गुन्हेशाखेचे पथकसुध्दा आरोपींच्या शोधात होते. दरम्यान गुन्हेशाखेच्या पथकाला लुटारुंबाबत माहिती मिळताच त्यांनी तीन युवकांना अटक करुन एका अल्पवयीनला ताब्यात घेऊन मुद्देमाल जप्त केला. या कारवाईत पोलीस निरीक्षक बाबाराव अवचार, सहायक पोलीस निरीक्षक महेश इंगोले, पोलीस उपनिरीक्षक संजय वानखडे, दिपक सुंदरकर, गजानन ढेवले, आस्तीक देशमुख,मनोज ठोसर, मंगेश शिंदे, संग्राम भोजने, चेतन कराडे, राजीक रायलीवाले, सागर ठाकरे, योगेश पवार, संदीप खंडारे, चेतन शर्मा आणि राहुल दुधे यांचा समावेश आहे.

# मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थीसाठी आधार पडताळणी अनिवार्य

## ३० एप्रिलपूर्वी पडताळणी करण्याचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३अमरावती** कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभागाच्या मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेतील प्रशिक्षणार्थ्यांची आधार पडताळणी अनिवार्य करण्यात आली आहे. ज्या प्रशिक्षणार्थ्यांनी १० मार्च २०२५ पूर्वी प्रशिक्षणाचे सहा महिने पूर्ण केले आहेत, त्यांना आता उर्वरित पाच महिने प्रशिक्षण पूर्ण करण्याची संधी मिळणार आहे. यासाठी ३० एप्रिलपूर्वी कागदपत्रे पडताळणी करावी लागणार आहे.योजनेचा लाभ घेण्यासाठी इच्छुक असणाऱ्या नविन उमेदवारांना देखील आधार पडताळणी करणे आवश्यक आहे. प्रशिक्षणार्थ्यांनी त्यांचे आधार कार्ड, शैक्षणिक पात्रता, वय, अधिवास प्रमाणपत्र आणि योजनेच्या वेबपोर्टलवरील प्रतिज्ञापत्र सादर करणे अनिवार्य आहे. यापुढे आधार संलग्न बँक खात्यांमध्ये विद्यावेतन जमा केले जाणार आहे, त्यामुळे प्रशिक्षणार्थ्यांनी बँकखात्याला आधार लिंक करणे आवश्यक आहे. आधार पडताळणी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरच प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षणासाठी रुजू करून घेतले जाणार आहे.इच्छुक उमेदवार आणि आस्थापनांनी ३० एप्रिलपर्यंत जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, अमरावती येथे संपर्क साधून आवश्यक कागदपत्रे जमा करून पडताळणी करावी.

अधिक माहितीसाठी किंवा अडचणी असल्यास, जिल्हा समन्वय अधिकारी प्रथमेश सोहळे (८४४६१५८२९७) आणि अतुल गवई (९४०४७९९९७१) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहायक आयुक्त प्रांजली बारस्कर यांनी केले आहे.

# परीक्षा अर्जासाठी विद्यार्थ्यांना दिलासा

## अमरावती विद्यापीठाने १० एप्रिलपर्यंत वाढवली मुदत

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३अमरावती–** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष २०२४-२५ च्या उन्हाळी परीक्षांसाठी आवेदनपत्र भरण्याची मुदत वाढवली आहे. नियमित विद्यार्थ्यांसाठी १० एप्रिलपर्यंत तर माजी विद्यार्थ्यांसाठी ३ एप्रिलपर्यंत ही मुदत देण्यात आली आहे.

विद्यापीठाने ही मुदतवाढ महाविद्यालयांच्या विनंतीवरून दिली आहे. यापूर्वी ही मुदत २१ ते ३१ मार्च होती. यू.जी.



एन.ई.पी., बी. फार्म सत्र १ व २ आणि एम. फार्म सत्र १ च्या परीक्षा वगळता सर्व अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांना या मुदतवाढीचा लाभ घेता येईल.ज्या विद्यार्थ्यांनी मागील परीक्षेचे आवेदनपत्र भरलेले नाही किंवा ज्यांच्या परीक्षेत खंड पडला आहे, त्यांना ३ एप्रिलपूर्वी अर्ज भरणे आवश्यक आहे. परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी यांनी सर्व महाविद्यालयांना याबाबत कळवले आहे.

अधिक माहितीसाठी विद्यार्थी विद्यापीठाच्या वेबसाईटवर दिलेल्या क्रमांकावर संपर्क साधू शकतात. सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य, विभागप्रमुख आणि विद्यार्थ्यांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहन विद्यापीठाने केले आहे.

# एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेचा अजब घोळ

## बॅनरवर आनंद दिघे म्हणून अभिनेते प्रसाद ओकचा फोटो


### अमरावतीच्या जिल्हाप्रमुखांचा प्रताप

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३अमरावती–** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे गुरु आनंद दिघे म्हणून शिवसेनेच्या अमरावतीच्या जिल्हाप्रमुखाने बॅनरवर धर्मवीर चित्रपटातील अभिनेते प्रसाद ओक यांचा फोटो वापरल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकाराची जिल्ह्याच्या राजकीय वर्तुळात खमंग चर्चा रंगली आहे.

एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील सत्ताधारी शिवसेनेने नुकतीच अमरावती जिल्ह्याची कार्यकारिणी जाहीर केली. त्यात जिल्हाप्रमुखपदी ठाकूर प्रमोदसिंह गड्रेल यांची निवड करण्यात आली. या निवडीनंतर ठाकूर यांना शुभेच्छा देण्यासाठी तयार करण्यात आलेल्या बॅनवर आनंद दिघे यांच्या जागी अभिनेता प्रसाद ओक यांचा फोटो लावण्यात आला. विशेष म्हणजे स्वतः ठाकूर प्रमोद सिंह यांनी गुढीपाडवा व स्वामी प्रकट दिनाच्या शुभेच्छा देण्यासाठी तयार केलेल्या बॅनरवरही आनंद दिघे म्हणून प्रसाद ओकचा फोटो छापण्यात आला आहे.






# श्री विशाल मोहोड यांच्या कीड कादंबरीला बळीराजा प्रतिष्ठान

## शेळवे तर्फे रानशिवार राज्यस्तरीय साहित्य पुरस्कार २०२४-२५ प्रदान

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३पंढरपूर** –बळीराजा प्रतिष्ठान, शेळवे ता. पंढरपूर जि. सोलापूर यांच्या वतीने दिले जाणारे रानशिवार राज्यस्तरीय साहित्य पुरस्कार सोहळा २०२४-२५ हा मंगळवार दिनांक ०१.०४.२०२५ ला खेळभाळवणी ता पंढरपूर जि. सोलापूर येथे मोठ्या थाटामाटात संपन्न झाला असून या कार्यक्रमाला मा. अभिजित(आबा) पाटील, आमदार माढा विधानसभा,शहाजी (बापू)पाटील, मा. आमदार सांगोला विधानसभा,दत्तात्रय सावंत सर, शिक्षक आमदार पुणे विभाग, आणि जेष्ठ साहित्यिक हरिश्चंद्र पाटील सर उपस्थित होते. बळीराजा प्रतिष्ठानचे मुख्य संयोजक, श्री प्रकाश दादा गांजरे, तसेच ज्ञानवर्धिनी प्रतिष्ठानचे संयोजक अंकुश दादा गांजरे उपस्थित असून कार्यक्रमाचे बहारदार सूत्र संचालन श्री अंकुश गांजरे यांनी केले असून कार्यक्रमाच्या सुरुवातीला काव्य संमेलन पार पडले त्यानंतर मान्यवरांचे सत्कार होऊन पुरस्कार प्राप्त सर्व साहित्यिकांचा सत्कार झाला यामध्ये तळवेल, अमरावती येथील श्री विशाल मोहोड यांच्या कीड कादंबरीचा रानशिवार साहित्य पुरस्कार २०२४-२५ हा प्रदान करण्यात आला असून या पुरस्काराचे स्वरूप सन्मानपत्र,



सन्मानचिन्ह, शाल, श्रीफळ, हार असून,कीड कादंबरीला मिळालेला यावर्षीचा हा अकरावा राज्यस्तरीय पुरस्कार आहे, या कादंबरीमध्ये आजच्या वास्तव परिस्थितीचे भयाण चित्र मांडत विध्यार्थ्यांची होणारी होरपळ, आत्महत्या करायला प्रवृत्त होणारा तरुण वर्ग, शिवाय शेतीची बिकट अवस्था, त्यामुळे जन्मोजन्मीची होणारी नापीकी आणि त्यातच या तरुणांना सतत टोमणे मारणारा आजचा समाज, शिवाय शासनाचा या सर्व घटने कडे पाहण्याचा दृष्टिकोन ही सर्व परिस्थिती या 'कीड' कादंबरीत मांडलेली असून सध्या ही कादंबरी संपूर्ण महाराष्ट्रभर चर्चेत आहे.सर्व स्तरातुन या कादंबरीवर शुभेच्छाचा वर्षाव होतं असून लेखक/ कवी विशाल मोहोड हे आपल्या लिखाणाचं सर्व श्रेय आपल्या आई, दादाला आणि पत्नीला देत असून आपल्याला साहित्य लिहिण्यासाठी सदैव प्रेरित करणाऱ्या त्या सर्व साहित्यिक मंडळीला सुद्धा देत आहे.-

# शेंदूरजनाघाट येथील हळदीची मागणी वाढली

## यंदा भाव २५० ते ३०० रु. किलो; हळदीसह एरंडी, मिरची, भेंडी, टोमॅटो पिकाची लागवड

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३शे.घाट–** बहुगुणी, आरोग्यदायी हळद उत्पादनासाठी शेंदुजनाघाट प्रसिद्ध असून, येथे हळदीचे पीक घेणारे पिढीजात शेतकरी आहेत.या परिसरात काही वर्षा पूर्वी हळदीचे उत्पादन होत होते. सध्या हळदीचा पेरा कमी झाला तरीही हळद पिकाकडे नगदी पीक म्हणून बघितले जाते. उत्पादन घटले तर हळदीचा दर्जा कायम असल्यामुळे येथील हळदीला चांगली मागणी आहे. सध्या हळदीची पावडर व साबुत हळद २५० ते ३०० रु. प्रति किलो दराने विकली जात आहे.

सध्या हळद पिक काढण्याचे काम आटोपले असून, खोदलेली हळदी उकडून वाळवणे, त्यानंतर वाळवून विक्रीसाठी तयार करण्याचे काम सुरू आहे. या गावात हळद लागवड करणारे पिढीजात असून, शेतकरी हळदीचे उत्पादन मोठ्या प्रमाणात घेत होते. परंतु, जागेचा अभाव व बाजार पेठ उपलब्ध नसल्याने तसेच हळद तयार करण्याचा खर्च वाढल्याने लागवडीचा खर्च निघत



नव्हता. परिणामी हळदीचे लागवड क्षेत्र कमी झाले आहे. हळदीचे पिक घेणारे शेतकरी उन्हाळ्यात शेतीची मशागत करून मृगाच्या पावसाची वाट पाहत असतात. पाऊस आला की, सर्वप्रथम हळद पिकाची लागवड केली जाते. हळदीसोबत एकाच वेळी अंतरीत पीकही घेतले जाते. यात एरंडी, मिरची, भेंडी, टमाटर, वाल, काकडी या पिकांचा समावेश आहे.

मागील काही वर्षा अगोदर हळद पीक उत्पादकांनी विक्रीसाठी हळद तयार केली. परंतु, अपेक्षित संख्येत बाहेर गावचे व्यापारी न आल्याने हळद कवडीमोल भावाने विकावी लागली तरीही हळदीचा पेरा सुरूच आहे. यंदा चांगला भाव मिळेल या आशेवर हळद उत्पादक शेतकरी आहेत.

# जामगांव ( खडका ) सेवा सहकारी सोसायटीच्या संचालक पदासाठी विलास पाटील अविरोध

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३ वरुड–** वरुड तालुक्या अंतर्गत येणाऱ्या जामगाव खडका येथील सेवा सहकारी सोसायटीची निवडणूक नुकतीच जाहीर झाली असून या निवडणुकीमध्ये नामनिर्देशन पत्र दाखल करण्याची अंतिम तारीख ही २८ होती या तारखेपर्यंत जवळपास २९ नामनिर्देशन पत्र दाखल झाले होते या अर्जाची छाननी १ एप्रिल रोजी करण्यात आली असून यामध्ये विलास पाटील यांच्या विरोधात सुभाष तुकाराम युवनाते व महादेव चांगो तायवाडे या दोघांचे उमेदवारी अर्ज होते छाननीअंती या दोघांचे उमेदवारी अर्ज निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी नामंजूर केल्यामुळे विलास पाटील हे अविरोध झाले आहे त्यांच्या या अविरोध निवडून येण्यामुळे गावातील



नागरिकांनी विलास पाटील यांचे अभिनंदन केले आहे. या निवडणुकीत प्रतिस्पर्धी दोन पॅनल आहे, दोन्हीही पॅनल भक्कम असल्यामुळे निवडून कोण येईल हे सांगता येत नाही त्यामुळे या सेवा सहकारी सोसायटीवर कोणाचे वर्चस्व प्रस्थापित होणार याकडे मात्र तालुका वासियांचे लक्ष लागलेले होते अशातच अनुसूचित जाती जमाती मधून पत्रकार विलास पाटील यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला होता त्यांच्या विरोधात प्रतिस्पर्धी गटाचे दोन उमेदवार निवडणूक रिंगणात होते अशातच दोन्ही उमेदवारावर कर्ज असल्यामुळे निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी त्या दोघांचेही उमेदवारी अर्ज नामंजूर केले त्यामुळे पत्रकार विलास पाटील हे अविरोध निवडून आले आहे .

विदर्भ प्रजासत्ताक

# अकोल्यात वादळाने केळी कांदा, आंब्याचे नुकसान

## आजही वाऱ्याचा वेग ४० ते ५० किमी प्रतितास राहण्याचा हवामान खात्याकडून अंदाज व्यक्त

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३ अकोला**

वादळ वाऱ्यामुळे हातातोंडाशी आलेली केळी, कांदा व आंबा पिकांचे प्रचंड नुकसान झाले. बाळापूर तालुक्यात २.४ मिमी पावसाची नोंद करण्यात आली असून २२ हेक्टर क्षेत्रावरील केळी, कांद्याचे मोठे नुकसान झाले आहे. बोरगाव मंजू परिसर व मूर्तिजापूर तालुक्यातील काही गावातील पिके प्रभावित झाली. गुरुवारीही विजेच्या कडकडाटासह पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. ताशी ४० ते ५० किमी प्रतितास याप्रमाणे हवेचा वेग राहण्याची शक्यता आहे. वीज, वारा व पावसापासून बचावाकरिता सुरक्षीत ठिकाणी आश्रय घेण्यात यावा, अशा स्थितीत झाडाखाली आश्रय घेऊ नये,



अशा सूचना जिल्हा प्रशासनाने दिल्या आहेत.

मंगळवारी मध्यरात्रीनंतर जिल्ह्यातील काही भागात वादळी वाऱ्यासह पाऊस झाला. त्यात शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. बोरगाव मंजू, निपाणासह काही भागात वादळी वाऱ्याने फळ बागांचे मोठे नुकसान झाले. महादेव जायले यांच्या शेतातील आंब्याच्या झाडाखाली अक्षरश: लहान-मोठ्या कैऱ्यांचा सडा पडला होता. तसेच परिसरातील आंबा उत्पादक शेतकऱ्यांचेही नुकसान झाले आहे. यंदा उन्हाळी ज्वारीचा पेरा मोठ्या प्रमाणात झाला. सध्या ज्वारीचे पीक कणसामध्ये आहे, वाऱ्याने ज्वारीचे पिक पडले आहे. काही शेतकऱ्यांच्या पपईचे देखील नुकसान झाले. बाळापूर तालुक्यात शेत शिवारात उघड्यावर असलेल्या मेंढ्या थंडगार पावसाने भिजल्याने त्या आजारी पडल्या आहेत. त्यामुळे पशुपालक संकटात आले आहेत. तामशी शिवारात वाऱ्यामुळे कापणीला आलेल्या केळी घडाच्या ओझ्याने उन्मळून पडल्या. एकरी ५० टक्केच्या जवळपास केळी उत्पादक शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. साडेचार एकरपैकी दीड एकरातील केळीचे नुकसान झाल्याचे शेतकरी अमोल काळे यांचे म्हणणे आहे. कांदा उत्पादक शेतकऱ्यांचेही मोठे नुकसान झाले आहे. शेतात काढून ठेवलेला कांदा पावसाने भिजल्याने तो खराब झाला आहे. हा कांदा आता पाणी लागल्याने लवकर सडेल व टिकावू नसेल, त्याचा फायदा उचलत व्यापारीही कवडीमोल दराने खरेदी करणार असल्याने शेतकऱ्यांनी लावलेला खर्चही निघतो की नाही, अशी बिकट स्थिती निर्माण झाली आहे. लिंबू, टरबूज, काढणीला आलेला गहू आणि भाजीपाला वर्गीय पिकांचे या पावसामुळे नुकसान झाले आहे.

# 'आनंदाचा शिधा' पाठोपाठ तीन गॅस सिलिंडर मोफत घोषणेलाही हरताळ

## मार्चची डेडलाईन संपली, रक्कम न मिळाल्याने लाभार्थी महिलांमध्ये असंतोष

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अकोला**

'आनंदाचा शिधा' पाठोपाठ सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील (पीडीएस) मोफत तीन गॅस सिलिंडरच्या योजनेनेही नागरिकांना धोका दिला आहे. जिल्ह्यातील तब्बल ७ लाखांहून अधिक कुटुंबधारक गॅस सिलिंडरच्या रकमेपासून वंचित आहेत. शासनाने पैसाच वळता केला नाही म्हणून लाभार्थ्यांच्या खात्यात रक्कम जमा झाली नाही, हे वास्तव असल्यामुळे आता प्रशासन व गॅस कंपन्यांमध्ये चालढकलीची भाषा केली जात आहे.




राज्य सरकारमध्ये असलेल्या तिन्ही पक्षांनी गॅस कनेक्शनधारक महिलांना तीन गॅस सिलिंडर मोफत पुरवण्याची घोषणा केली होती. निवडणुकीच्या काळात या योजनेचा मोठा गवगवाही करण्यात आला होता. त्यासाठी उज्वला गॅस योजनेच्या लाभार्थी महिला आणि गॅस कनेक्शन नावाने असलेल्या 'लाडकी बहिण' पात्र ठरवण्यात आल्या होत्या. त्या घोषणेनुसार मार्च २०२५ च्या आंत उचल केलेल्या सिलिंडरपैकी तीन सिलिंडरची रक्कम राज्य सरकार अदा करणार होते. परंतु वास्तव तसे नाही. काहींना फक्त एक सिलिंडर मोफत मिळाले, अनेकांना मात्र तेही मिळाले नाही. त्यामुळे दोन्ही घटकांत मोडणाऱ्या महिलांमध्ये प्रचंड नाराजी पसरली आहे. जिल्हा प्रशासनाच्या मते रक्कम वितरणाची ऑनलाइन प्रणाली बदलवली जात असल्याने ही रक्कम अडली आहे. तर तिकडे राज्य शासनाने पैसा वळताच केला नाही. लाभार्थ्यांची यादी आणि रक्कम या दोन्ही बाबींची पुर्तता झाली की लगेच संबंधित लाभार्थ्यांच्या खात्यात पैसे वळते केले जातात, असे गॅस कंपन्यांचे म्हणणे आहे.

# हनुमान जयंतीनिमित्त आझाद हिंद मंडळातर्फे कार्यक्रम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती**

श्री हनुमान जयंतीनिमित्त आझाद हिंद मंडळाद्वारे विविध सामाजिक, धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. रविवार ६ एप्रिल रोजी श्रीराम जन्माचा सोहळ्याचे स. १०.३० ते दुपारी १२.३० वाजेपर्यंत आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये परिहार भजनी मंडळ बुधवारा आणि सहकारी महिला भजनी मंडळाचे भजन आयोजित करण्यात आले आहे. बुधवार ९ एप्रिल रोजी सायं. ७.३० वाजता श्री सरस्वती संगीत विद्यालय बुधवारा प्रस्तुत, तबला जुगलबंदी आणि भक्तीगीतांचा कार्यक्रम होणार आहे. गुरुवार १० ते शनिवार १२ एप्रिल या कालावधीत रात्री ७.३० वाजता हरी भक्त पारायण वृषाली प्रसाद पांडे यांचे तीन दिवस श्रव्य 'नारदीय कीर्तन' होणार आहे. शुक्रवार ११ रोजी रात्री ११.०० नंतर संगीत तुलसी रामायण (सुंदरकांड) सादरकर्ते सतिश श्रीवास व संच यांचा गायन कार्यक्रम करण्यात आला आहे. शनिवार १२ रोजी स. ५ ते ७ वाजेपर्यंत श्री हनुमान जन्माचे कीर्तन आणि रविवार १३ एप्रिल सायं. ५.०० वाजता गोपाळ काल्याचे कीर्तन हरी भक्त पारायण डॉ. श्रीकृष्णराव जिरापुरे यांचे होणार आहे. रविवार १३ एप्रिल रोजी महाप्रसादाचा कार्यक्रम सायं. ७ वाजता आयोजित करण्यात आला आहे. सार्वजनिक श्री हनुमान मंदिर संस्थान बुधवारा (प्रांगण) येथे सर्व भाविक बंधु आणि भगिनिंनी कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन विश्वस्थ मंडळ, श्री हनुमान मंदिर देवस्थान, आझाद हिंद मंडळांने केले आहे.

# जिल्ह्यात १२ टँकरने पाणी पुरवठा; २८ विहिरींचे अधिग्रहण

## चिखलदरा तालुक्यात ११ टँकर ने पाणीपूवठा सुरू

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३ चिखलदरा**

सद्यस्थितीत सहा गावांमध्ये १२ टँकरद्वारे पाणी पुरवठा तर २८ खासगी विहिरींद्वारे तहान भागविल्या जात आहे. या गावांमध्ये जलजीवन मिशनची रखडल्याने तीव्रता वाढली कामे पाणीटंचाईची तीव्रता वाढली.

यंदा भूजलस्तर वाढलेला आहे. त्यामुळे मार्चअखेरपर्यंत फारशी पाणीटंचाई उद्भवली नाही. मात्र मार्चअखेरीस उष्णतेची लाट आली व तापमानाची दाहकता वाढताच पाणीटंचाईने डोके वर काढले आहे.जिल्हाधिकारी कार्यालयाच्या अहवालानूसार ३४ गावांमध्ये तात्पुरत्या उपाययोजनांमध्ये १० खासगी बोअर अधिग्रहित करण्यात आल्या आहेत. यामध्ये चिखलदरा तालुक्यात ५ व अचलपूर तालुक्यात ४ बोअरचा समावेश आहे. याशिवाय नांदगाव तालुक्यात १, मोर्शी व तिवसा तालुक्यात प्रत्येकी ४, अमरावती व चांदूर रेल्वे तालुक्यात प्रत्येकी ३ तसेच चिखलदरा २ व भातकुली व अचलपूर तालुक्यात प्रत्येकी एक विहिरीचा समावेश आहे.चिखलदरा तालुक्यात सर्वाधिक ११ टँकर सुरू आहेत. यामध्ये आकी येथे १, मोथा, लवादा, व तारूबांदा गावात प्रत्येकी २ तर खडीमल येथे ४ टँकर याशिवाय चांदूर रेल्वे तालुक्यात सावंगीला १ टँकर सुरू आहे.

### १६० उपाययोजनांना जिल्हाधिकाऱ्यांची मंजुरी

आराखड्यात १०३४ उपाययोजना प्रस्तावित करण्यात आल्या होत्या. यापैकी १६० उपाययोजनांना जिल्हाधिकारी यांनी मंजुरी दिलेली आहे. तर ५० उपाययोजनांची कामे प्रगतिपथावर आहेत. नळयोजनांच्या विशेष दुरुस्तीसाठी ५६ प्रस्ताव सादर करण्यात येणार आहे.

# महापालिकेत ५ एप्रिलपासून ई-ऑफीस प्रणाली होणार कार्यान्वित

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती**

मुख्यमंत्र्यांच्या महत्वाकांक्षी १०० दिवस कृती आराखडा या कार्यक्रमांतर्गत राज्यातील सर्व महानगरपालिका व नगरपरिषदमध्ये ई-ऑफिस प्रणाली लागू केली जाणार आहे. त्यासाठी अमरावती महानगरपालिकेच्या विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात बुधवारी (ता. दोन) दुपारी ३ वाजता प्रशिक्षण घेण्यात आले. आता अमरावती महापालिकेत ५ एप्रिलपासून ई-ऑफिस प्रणाली कार्यान्वित



केली जाणार आहे.

महानगरपालिका क्षेत्रात ई-ऑफिस प्रणालीची प्रभावी अंमलबजावणीकरण्यासाठी, महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक सचिन कलंत्रे यांच्या सूचनांनुसार, मनपा कार्यालयांमध्ये तैनात अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना ई-ऑफिस प्रणालीचे प्रशिक्षण देण्यात आले. प्रशिक्षणात, जिल्हाधिकारी कार्यालयातून प्रफुल्ल मेहेर व आशिष विधळे यांनी सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना ई-ऑफिस प्रणाली अंतर्गत विविध कार्ये आणि त्यांचा वापर कि याबद्दल सविस्तर माहिती दिली.

प्रशिक्षणात, ई-ऑफिसचा परिचय आणि वापर, दस्तऐवज तयार करणे आणि मंजुरी प्रक्रिया, अहवाल देणे आणि फाइल ट्रॅकिंगप्रक्रियेत पारदर्शकता आणि कार्यक्षमता, वेळेची बचत होईल. सदर प्रशिक्षणामध्ये आयुक्त तथा प्रशासक सचिन कलंत्रे, उपायुक्त मेघनावासनकर, सिस्टीम मॅनेजर अमित डेंगरे, कनिष्ठ लिपिक ऋषिकेश चवरे, सॉफ्टवेअर अभियंता रोहन कुरील, प्रकल्प अभियंता पंकज मानवटकर, हार्डवेअर अभियंता चेतन रामटेके, तसेच सर्व अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

# मुद्रांक शुल्कचा सुमारे नऊ कोटी ९८ लाख ५५ हजार ८३२ रुपयाचा निधी शासनाकडे थकीत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती**

शासनाकडे जिल्हा परिषदेचे मुद्रांक शुल्क आणि उपकराचे २४ कोटी ७९ लाख ८६ हजार ९५५ रुपयांचे येणे आहेत. अशातच मार्च एंण्डिगच्या अखेरच्या दिवशी शासनाकडून जिल्हा परिषदेला प्रलंबित देणी मिळतील, अशी अपेक्षा होती. मात्र, वर्षाअखेरीस अवघा १४ कोटी १८ लाख ३१ हजार १२५ रुपयांचा निधी प्राप्त झाला आहे. त्यामुळे जिल्हा परिषदेचे मुद्रांक शुल्कचा सुमारे नऊ कोटी ९८ लाख ५५ हजार ८३२ रुपयांचा निधी शासनाकडे थकीत राहिला आहे.मुद्रांक शुल्काच्या जवळपास १० टक्के

कोटी रुपयांचा निधी शासनाकडे अडकला आहे. मोठा निधी थकीत असल्यामुळे मार्चअखेरीस मिळेल, अशी प्रशासनाची अपेक्षा होती. मात्र, मुद्रांक शुल्क व उपकरापोटी १४ कोटी ८१ लाख ३१ हजार १२५ रुपयांचा निधी उपलब्ध झाला आहे. गेल्या काही वर्षापासून शासनाकडे येणी थकीत असल्याने स्वीय निधीवर परिणाम होत आहे. आधीच निधीचा दुष्काळ असल्याने मुद्रांक शुल्कच्या रकमेबाबत दिलासादायकचित्र निर्माण झाले होते. मात्र, मार्च एंडिंग असल्याने शासनाकडून जिल्हा परिषदेला निधी मिळेल, अशी अपेक्षा होती. परंतु, मुद्रांक शुल्कापोटी तुटपुंजी रक्कम गागान आली.

# संतापजनक! शाळेतील कर्मचाऱ्याकडून १० विद्यार्थिनींचा विनयभंग; अकोल्यात खळबळ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अकोला**

शहरातील कौलखेड भागातील मराठी प्राथमिक शाळेतील एका कर्मचाऱ्यानं तब्बल १० चिमुकल्या विद्यार्थिनींचा विनयभंग केल्याची धक्कादायक घटना समोर आलीय. याप्रकरणी जिल्हा व महिला बालविकास अधिकारी कार्यालय अंतर्गत चाइल्ड हेल्पलाइनच्या महिला समन्वयकानं दिलेल्या तक्रारीवरून खदान पोलिसांनी आरोपीला अटक केलीय. हेमंत चांदेकर असं अटक करण्यात आलेल्या आरोपी




कर्मचाऱ्याचं नाव आहे.

शाळेतील काही महिला शिक्षिका प्रशिक्षणासाठी ५ मार्चपासून बाहेरगावी गेल्या होत्या आणि शाळेचे कामकाज सांभाळण्याची जबाबदारी असलेल्या आरोपीनं या परिस्थितीचा गैरफायदा घेत इयत्ता चौथी व इयत्ता सातवीत शिक्षण घेणाऱ्या दहा विद्यार्थिनींचा विनयभंग केला. शिक्षिका प्रशिक्षण आटोपून परत आल्यानंतर काही विद्यार्थिनींनी त्यांच्यासोबत घडलेला प्रकार त्यांना सांगितला. यानंतर शिक्षण संस्थाचालकांनी आरोपीला ८ मार्चपासून शाळेत कर्तव्यावर न येण्याचा आदेश दिला. यानंतर या आरोपीच्याविरोधात खदान पोलिसांत तक्रार नोंदवण्यात आली. प्राप्त तक्रारीवरुन खदान पोलिसांनी विविध कलमान्वये या आरोपीवर गुन्हे दाखल करून त्याला अटक केलीय.

दरम्यान, या घटनेमुळं शिक्षण क्षेत्र हादरलं असून विद्यार्थ्यांच्या पालकांनी संताप व्यक्त केलाय. तसंच शाळेतील शिक्षिका प्रशिक्षणासाठी गेल्या होत्या, तर त्यावेळी शाळा प्रशासनानं दुसऱ्या शिक्षिकांची त्याठिकाणी नियुक्ती का केली नाही? असा सवाल पालकांनी उपस्थित केलाय. दरम्यान, या घटनेनं काही पालक मुलांना शाळेतून काढण्याच्या मनस्थितीत असल्याचं समजतंय. मात्र, पालकांनी याबाबत कुठलीही प्रतिक्रिया देण्यास टाळलं आहे.

# नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील कांदा उत्पादक शेतकरी पिक विम्याचे संरक्षण पासून वंचित

## तालुका कृषी कार्यालयाला पडला विसर : शिवसेनेचे प्रकाश मारोटकर यांची जिल्हा कृषी अधिक्षक कार्यालयात धडक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३ नांदगाव खंडेश्वर**

तालुक्यातील हजारो हेक्टर कांदा ऊत्पादक शेतकरी प्रधानमंत्री पिक विमा योजनेच्या संरक्षणापासून वंचित असून तातडीने कांदा पिकाला पिक विम्याचे संरक्षण देण्यात यावे अन्यथा कृषी कार्यालयात तीव्र आंदोलन छेडू असा इशारा शिवसेनेचे प्रकाश मारोटकर यांनी शेतकऱ्यांसह जिल्हा कृषी अधिक्षक कार्यालयात धडक देऊन दिला. शेतकऱ्यांच्या विविध शेती पिकांचे नैसर्गिक आपत्ती पासून संरक्षणा करिता व शेती पिकांचे नुकसान झाल्यास त्यांना आर्थिक मदत मिळावी या करिता सन २०१६ पासून प्रधानमंत्री पिक विमा योजना अमलात आली तेव्हापासून नांदगाव तालुक्यातील कांदा उत्पादक शेतकरी पिक विमा योजनेच्या संरक्षणापासून वंचित असून याचा कृषी विभागाला चक्क



विसर पडला असून जिल्ह्यात मात्र सर्वच तालुक्याला कांदा पिकाला विम्याचे संरक्षण आहे. अवकाळी पाऊस व गारपीट मुळे कांदा पिकांचे प्रचंड नुकसान होते अशात पिक विम्याचे संरक्षण नसल्याने शेतकऱ्यांना विम्याची नुकसान भरपाई मिळत नाही त्यामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान मागील दहा वर्षापासून होत आहे. तातडीने नांदगाव तालुक्यातील कांदा पिकाला पिक विम्याचे संरक्षण देण्यात यावे अन्यथा शिवसेना तीव्र आंदोलन छेडेल असा इशारा ठाकरे गटाचे विधानसभा समन्वयक प्रकाश मारोटकर यांनी जिल्हा कृषी अधिक्षक यांना निवेदन सादर करून दिला आहे. यावेळी माजी नगरसेवक निलेश इखार गोपाल बनकर गुणवंत चंदूरकर सुनिल गुल्हाने रितेश जाधव अंकुश मुळे लोकेश उडबगले शुभम सावरकर प्रदीप पोफळे योगेश राऊत मुरलीधर केशरखाने सुनिल पवार निवृत्ती केशरखाने काशिनाथ राऊत शुभम रावेकर रवि ठाकूर अन्य शेतकरी उपस्थित होते.

# भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे अधिवेशन ५ एप्रिलला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती**

भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे हे शंभरावे वर्ष आहे. त्यानिमित्त नांदगाव खंडेश्वर शाखेचे २५ वे त्रै वार्षिक अधिवेशन शनिवारी, ५ एप्रिलला आयोजित केले आहे. वाघोडा येथे होणाऱ्या या अधिवेशनाच्या उद्घाटनप्रसंगी अध्यक्षस्थानी सरपंच नारायणराव भगवे राहतील. उद्घाटन राष्ट्रीय कौन्सिल सदस्य तुकाराम भस्मे यांच्या हस्ते होणार असून प्रमुख अतिथी म्हणून प्रा. प्रसेनजीत तेलंग, भाकपचे सचिव सुनील मेटकर, विनोद जोशी, संजय मंडवघरे, चित्रा वंजारी उपस्थित राहतील. यावेळी सदस्यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन संतोष सुरजुसे, ओमप्रकाश सावळे यांनी केले आहे.

# महाराष्ट्रात वीज स्वस्त होणार नाहीच

## महावितरण आणि आयोगातील वादाचा बसणार ग्राहकांना फटका

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३नागपूर**

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग आणि महावितरण यांच्यातील वादामुळे राज्यातील नागरिकांना सध्या तरी स्वस्त वीज मिळणार नाही. नागरिकांना सध्याच्याच जुन्या दरानुसार वीजबिल भरावे लागेल. महावितरणच्या आक्षेपानंतर नियामक आयोगाने सर्व श्रेणीच्या वीज दरात सुमारे १० टक्के कपात करण्याच्या निर्णयाला तात्पुरती स्थगिती दिली आहे.




महावितरणने २०२५-२६ ते २०२९-३० या कालावधीसाठी दर निश्चिती याचिका दाखल केली होती. आयोगाने २८ मार्च रोजी त्यावर निर्णय घेत वीज दरात सरासरी १० टक्के कपात जाहीर केली. नवीन दर १ एप्रिलपासून लागू होणार होते. मात्र, महावितरणने या आदेशावर आक्षेप घेत पुनर्विचार याचिका दाखल करण्याचा निर्णय घेतला.

आयोगाचे अध्यक्ष संजय कुमार, सदस्य सुरेंद्र बियाणी आणि आनंद लिमये यांच्या खंडपीठाने बुधवारी आपल्या जुन्या आदेशाला स्थगिती देत स्पष्ट केले की, सध्या नागरिकांना जुन्या दरानेच वीजबिल भरावे लागेल. आयोगाने सांगितले की, महावितरणच्या वकिलांनी त्यांच्या आदेशावर आक्षेप घेतला.

कंपनी एप्रिलच्या अखेरीस पुनर्विचार याचिका दाखल करणार असल्याचे सांगितले. कंपनीने आदेशावर स्थगिती देण्याची विनंती केली, जी आयोगाने मान्य केली. विशेष म्हणजे 'लोकमत' ने बुधवारच्या अंकात म्हटले होते की महावितरणला आयोगाच्या निर्णयावर आक्षेप असून पुनर्विचार याचिका दाखल करणार आहे.

**महावितरणच्या आक्षेपाचे मुद्दे**

महावितरणने आयोगाकडे ४८,०६६ कोटी रुपयांच्या भरपाईची परवानगी मागितली होती, मात्र आयोगाने ४४,४८० कोटींचा अधिशेष घोषित केला.घरगुती ग्राहकांचे दर कमी करण्याऐवजी औद्योगिक दरात मोठी कपात करण्यात आली. महावितरण टप्प्याटप्प्याने दर सवलत देण्याच्या बाजूने होते, मात्र आयोगाने एकदम कपात केली.आयोगाच्या अभिलेखांमध्ये स्पष्ट त्रुटी असल्याचा महावितरणचा दावा.आयोगाच्या निर्णयामुळे काही ग्राहक वर्गाचे नुकसान होईल.

# दलित वस्तीतील अनुदानीत गैरवापर प्रकरणी कारवाईचे आदेश ५४ कोटी रुपयांचा घोळ

## अचलपूर नपातील २०१३-१४ या वर्षातील प्रकरण सेवानिवृत्त दोषी अधिकाऱ्यांवर कारवाईची टांगती तलवार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३ अचलपूर**

नगरपालिकेतील २०१३-१४ या वर्षातील आर्थिक गैरवापर प्रकरणी महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाने नगर विकास सचिव ह्यांना तात्काळ कारवाईचे करण्याचे आदेश दिले आहेत. किशोर मोहोड यांनी सन २०१८ मध्ये ही तक्रार राज्य मानवी हक्क आयोगाकडे केली होती. त्यांच्या दीर्घ लढ्याला यश मिळाले असून आयोगाने १२ फेब्रुवारी २०२५ रोजी प्रधान सचिव नगर विकास २ यांना दोषीवर कारवाईचे निर्देश दिले आहेत.



दलित वस्ती अनुदानाचा गैरवापर २०१३-१४ मध्ये अचलपूर नगरपालिकेतील पदाधिकारी व प्रशासनाने संगनमताने मोठ्या प्रमाणात आर्थिक अनियमता केल्याचा आरोप आहे. विशेषतः अनुसूचित जाती-जमातीच्या निधीत मोठा गैरवापर झाल्याचे आढळले आहे. लेखापरीक्षण अहवालानुसार एकूण ५४ कोटी रुपयांचा घोळ असून हिशोब आक्षेपार्ह असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

प्राप्त माहितीनुसार किशोर मोहोड यांनी तक्रारीत सांगितले होते की शासन अनुदान मंजूर करून घेतल्यानंतर नियमबाह्य पद्धतीने निधी इतरत्र वळविण्यात आला. दलित वस्ती अनुदानित निधीचा लेखा नियमांचे पालन करण्यात आले नाही.चौकशी अहवालात स्पष्ट अनियमता: या तक्रारीवर चार सदस्यीय समितीने अभिप्राय सादर करत अनियमता झाल्याचे स्पष्टपणे नमूद केले आहे. उच्च न्यायालयात दाद मागण्यात आल्यानंतर महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाने या प्रकरणाची गंभीर दखल घेत दोषीवर तात्काळ कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत.आता या प्रकरणात दोषी असणाऱ्या विद्यमान व सेवा निवृत्त अधिकार्यांवर कारवाई होणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. आर.टी.आय. कार्यकर्ता मोहोड यांचा ७ वर्षांचा लढा यशस्वी होत असल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत.

# संत गाडगेबाबांच्या गावाकडे जाणाऱ्या रस्त्यावर खड्डेच खड्डे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अंजनगाव सुर्जी**

तालुक्यातील रस्त्यांची अवस्था दयनीय झाली असल्याने नागरिकांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे. खड्डेमय, उखडलेले आणि धोकादायक रस्ते यामुळे अपघातांचे प्रमाण वाढले आहे. संत गाडगे बाबा यांच्या शेंडगाव गावासाठी विकास आराखडा तयार करूनही, तेथे जाणारा रस्ता पूर्णपणे खड्ड्यांनी भरलेला आहे. या पार्श्वभूमीवर कसबेगव्हाण येथील सरपंच शशिकांत मंगळे यांनी नुकताच पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना निवेदन सादर केले. सातेगाव - विहिगाव - कापूसतळणी कसबेगव्हाण शिंगणापूर - नांदेड -आमला या मार्गाला 'राज्यमार्ग'चा दर्जा द्यावा, तसेच या रस्त्याचे काम केंद्रीय रस्ते निधी व सीएसआर अंतर्गत तातडीने सुरू करावे, यासोबतच प्रजिम क्र. १० (टाकरखेडा - कापूसतळणी - कोकर्डा - डोंबाळा नाचोना लेहगाव) व उमरी - वडाळगव्हाण - कोकर्डा - हयापूर या मार्गाचे प्रस्ताव तातडीने अर्थसंकल्पात समाविष्ट करून मंजूर करावेत, अशी आग्रही मागणीही करण्यात आली. यापैकी टाकरखेडा ते कापूसतळणीपर्यंत रस्ता होणे आवश्यक आहे. प्रजिमा १६ (श्यामपूर - कसवेगव्हाण - कमालपूर हयापूर- कोळंबी) या रस्त्याच्या कामासाठी ५ कोटी रुपयांचा निधी मंजूर असूनही, ठेकेदाराने कामास अद्याप सुरुवात केलेली नाही. श्यामपुर ते कसवेगव्हाण व घोडसगाव ते हवापूर कामास तात्काळ सुरुवात करण्यासाठी हस्तक्षेप करण्याची मागणीही करण्यात आली. कसवेगव्हाण गावातून जाणाऱ्या १.५ किमी रस्त्याचे सिमेंटकरण व सौंदर्याकरण करावे, अशीही मागणी करण्यात आली.

# 'समृद्धी'ची परिस्थिती सुधारली नाही तेल कंपन्यांनी दाखविलेले चित्र खोटे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३नागपूर**

राज्य सरकारचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प असलेल्या समृद्धी महामार्गावरील मूलभूत सुविधांबाबत इंडियन ऑइल, भारत पेट्रोलियम व हिंदुस्तान पेट्रोलियम या तिन्ही कंपन्यांनी उभे केलेले सुंदर चित्र खोटे असून, परिस्थितीत अद्यापही समाधानकारक बदल झालेला नाही, अशी माहिती जनहित याचिकाकर्ते अनिल वडपल्लीवार यांनी बुधवारी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाला दिली. त्यांनी यासंदर्भात प्रतिज्ञापत्र दाखल केले.



समृद्धीवरील पेट्रोल पंप परिसरात स्वच्छ प्रसाधनगृहे, पिण्याचे शुद्ध पाणी, साफसफाई, चांगली उपाहारगृहे इत्यादी सुविधा आहेत, अशी माहिती तेल कंपन्यांनी न्यायालयाला दिली होती. वडपल्लीवार यांनी त्या माहितीची सत्यता तपासण्यासाठी समृद्धी महामार्गावरील तिन्ही कंपन्यांच्या विविध पेट्रोल पंपांना भेट दिली असता विसंगत परिस्थिती दिसून आली. प्रसाधनगृहे घाण झाले होते. सर्वत्र दुर्गंधी पसरली होती. त्यांची नियमित साफसफाई केली जात नाही, असे चित्र होते. परिसरात प्लास्टिकचा कचरा पसरलेला होता. उपाहारगृहे अस्वच्छ होती. पिण्याचे शुद्ध पाणी नव्हते. महिलांच्या प्रसाधनगृहाचे दार तुटलेले होते, असे संबंधित प्रतिज्ञापत्राद्वारे न्यायालयाला सांगण्यात आले.

**पुढील सुनावणी २३ रोजी**

समृद्धी महामार्गावरील समस्यांसंदर्भात वडपल्लीवार यांची जनहित याचिका न्यायालयात प्रलंबित आहे. त्या याचिकेवर येत्या २३ एप्रिलला न्यायमूर्तीद्वय नितीन सांबरे व वृषाली जोशी यांच्यासमक्ष पुढील सुनावणी होणार आहे. त्यावेळी वडपल्लीवार यांनी तेल कंपन्यांवर केलेले आरोप विचारात घेतले जातील.समृद्धी महामार्गावरील मूलभूत सुविधांचे नियमित निरीक्षण करण्यासाठी न्याधिक अधिकारी, पर्यावरण तज्ज्ञ व सार्वजनिक सुरक्षा अधिकारी यांची स्वतंत्र समिती स्थापन करण्यात यावी, समृद्धी महामार्गावर आवश्यक ठिकाणी सूचना फलके व वीज दिवे लावण्यात यावेत, वैद्यकीय उपचार सुविधा व पेट्रोलिंग युनिट उपलब्ध करून देण्यात यावे, कायमस्वरूपी आरटीओ केंद्र व ईव्ही चार्जिंग स्टेशन स्थापन करण्यात यावे, पेट्रोल पंपांवरील अस्वच्छतेसाठी तेल कंपन्यांना जबाबदार धरण्यात यावे आदी मागण्या वडपल्लीवार यांनी न्यायालयाला केल्या आहेत.

# कैद्यांची संख्या दुप्पट, सुरक्षेसाठी मनुष्यबळ कमी, राज्यातील कारागृहांची समस्या गंभीर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३नागपूर**

राज्यातील कारागृहांत कैद्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून कारागृहाच्या सुरक्षेसाठी असणाऱ्या अधिकारी आणि सुरक्षारक्षकांची संख्या कमी आहे. राज्य कारागृह विभागात जवळपास ४० टक्के पदे रिक्त असून उपलब्ध असलेल्या कर्मचाऱ्यांवर सुरक्षेचा ताण वाढला आहे. राज्यात ६ हजार ६८ सुरक्षारक्षकांची पदे मंजूर असून प्रत्यक्षात मात्र ३ हजार ६८२ सुरक्षारक्षकच तैनात आहेत, अशी माहिती पुणे



महासंचालक कार्यालयातून मिळाली आहे.

राज्यातील प्रत्येक कारागृहात क्षमतेपेक्षा दीडपट ते दुप्पट कैदी कोंबल्या जात आहेत. तसेच राज्यातील अनेक कारागृहात कैद्यांमध्ये वाद आणि हाणामारीच्या घटना समोर येत आहेत. कैद्यांवर नियंत्रण ठेवणे किंवा त्यांना शिस्त लावण्यासाठी मोठा ताफा तैनात करावा लागतो. मात्र, राज्य कारागृहात जवळपास ४० टक्के पदे रिक्त असून उपलब्ध असलेल्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना सुरक्षा व्यवस्था सांभाळण्यासाठी तारेवरची कसरत करावी लागत आहे. कमी मनुष्यबळात क्षमतेपेक्षा जास्त असलेल्या कैद्यांचा ताण कारागृह प्रशासनावर पडत आहे. राज्यात नऊ मध्यवर्ती, २८ जिल्हा, १९ खुली व इतर अशी एकूण ६० कारागृहे आहेत. या कारागृहांची क्षमता २४ हजार असताना कारागृहात सध्या ३९ हजारांवर कैदी आहेत. कारागृहात क्षमतेपेक्षा कैदी जास्त आहेत. राज्य कारागृह विभागासाठी ७ हजार ६८ पदे मंजूर आहेत. त्यापैकी ४ हजार ३२८ पदे कार्यरत आहेत. अजुनही २७४० पदे रिक्त असल्याचे समोर आले आहे. मध्यवर्ती कारागृह अधीक्षक व जिल्हा कारागृह अधीक्षकांची पदेसुद्धा रिक्त असल्याची माहिती समोर आली आहे. तसेच प्रत्यक्ष कारागृहात कामाची अंमलबजावणी करणारे रक्षकांची २३८५ पदे भरली नसल्याचे समोर आले आहे. कारागृहात सुरक्षाव्यवस्थेसह अन्य कामांची वाढता ताण बघता कारागृहाची प्रशासन व्यवस्थेला मोठे खिंडार पडल्याचे चित्र आहे. अनेक कारागृहात तुरुंगाधिकारी नसल्यामुळे उपलब्ध अधिकाऱ्यांवर अनेक विभागाचा प्रभार देण्यात येत आहे. यामुळे कारागृह प्रशासन व्यवस्था खिळखिळी झाल्याचे दिसते.

# आ.रवी राणा यांनी मुख्यमंत्री यांचे कडे केलेल्या पाठपुराव्याला यश : जिल्ह्याला १५एस. टी. बसेस प्राप्त

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती**

आमदार रवी राणा यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस व परिवहन मंत्री यांना अमरावती विभागात नवीन एस टी बसेस उपलब्ध करून देण्यासाठी लेखी मागणी केली होती. याबाबत वाहतूक मध्यवर्ती कार्यालय मुंबई यांनाही पत्र दिले होते,या अनुषंगाने आमदार रवी राणा यांचा पाठपुरावा सुरू होता.

## राजापेठ बस डेपोतून ५ नवीन बसेस प्रवासी सेवेत धावणार



आमदार रवी राणा मतदारसंघातील, जिल्ह्यातील दौरा करताना एसटी बसची विदारक परिस्थिती बघतात ती त्यांनी महास्थापक वाहतूक यांच्याकडे जशी आहे तशी सांगितली त्यावर शासनाने राणा यांच्या मागणीची दखल घेत जिल्ह्याला १५ नविन एस टी बस मिळाल्या,या पैकी बडनेरा आगारात ०५ मिळाल्या त्याचा लोकार्पण शुभारंभ दि.०६/०४/२०२५रोजी राजापेठ बस डेपोतून होणार आहे..

आगामी काळात नवीन बसेस मिळणार आहे. असे लेखी उत्तर महा व्यस्थापक वाहतूक कार्यालय मुंबई यांनी आमदार रवी राणा यांना पाठविलेल्या पत्रात कळविले आहे. या संबंधाने आमदार रवी राणा यांच्यावर ग्रामीण व शहरी प्रवाशांकडून आभार व अभिनंदन होत आहे.

# कुष्ठरोगी बांधवांसाठी पद्मश्री डॉ. शिवाजीराव पटवर्धन यांनी स्थापन केले अमरावतीत जपानी शैलीतलं महादेव मंदिर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती**

अमरावती शहरात कुष्ठरोगी बांधवांसाठी पद्मश्री डॉ. शिवाजीराव पटवर्धन यांनी १९४६ मध्ये स्थापन केलेल्या तपोवनच्या परिसरात जपानी शैलीतलं एक आगळ वेगळं छोटंसं महादेव मंदिर या परिसरात येणाऱ्यांचं लक्ष वेधत आहे. ब्रिटिशांचे तीन टोप जणू एकमेकांवर ठेवून या मंदिराचं छत बांधण्यात आलं असं हे भासतं. या छताखाली चारही बाजूंनी लाकडांनी उभारलेले चौदा स्तंभ आणि त्यावर जपानी शैलीतील कलाकृती भुरळ घालणारी आहे. जपानी शैलीतील या मंदिरात शिवलिंगाचं दर्शन होतं.

समाजानं नाकारलेल्या कुष्ठरोगी बांधवांना जगण्याचा अधिकार मिळावा आणि त्यांच्या आजारावर इलाज व्हावा या उद्देशानं पद्मश्री डॉ. शिवाजीराव पटवर्धन यांनी १९४६ मध्ये अमरावती शहरालगत तपोवन या संस्थेची स्थापना केली. कुष्ठरोगी बांधवांचं जणू एक छोटसं आणि सुंदर असं गावच डॉ. शिवाजीराव पटवर्धन यांनी या परिसरात वसवलं. या परिसरात अनेक मंदिरं उभारण्यात आली. त्यापैकीच एक म्हणजे तपोवनात असणारं महादेवाचं मंदिर. १९४६ मध्येच महादेवाचं मंदिर तपोवन परिसरात बांधलं असलं तरी, हे मंदिर आज ज्या जपानी शैलीत उभारलेलं दिसतं, ते मात्र १९७४-७५ मध्ये खास




निर्माण करण्यात आलं असल्याची माहिती, तपोवन संस्थेचे अध्यक्ष प्रा. डॉ. सुभाष गवई यांनी दिली.

तपोवन परिसरात असणाऱ्या जपानी शैलीतील पॅगोडाप्रमाणे हे मंदिर लाकडाद्वारे बांधण्यात आलं. या मंदिराचं छत हे तीन स्तरांवर बांधण्यात आलं. जपानमध्ये मंदिरांवर छतांची पाच स्तरं असतात. हे पाच स्तर म्हणजे पृथ्वी, पाणी, अग्नी, वारा आणि आकाश यांचं प्रतीक मानलं जातं. तपोवनातील जपानी शैलीच्या मंदिरावर अगदी अलगद ठेवलं असावं असे तीन स्तर आहेत. हे स्तर चारही दिशेने खाली आल्यावर समोरून पुन्हा एकदा एखाद्या पक्षाच्या माने सारख्या आकारात ते आकाशाकडं उंचावले आहेत. हे तीन स्तरांचं छत एकूण १४ खांबांवर उभं करण्यात आलं. जपानी शैलीतील या महादेवाच्या मंदिरासमोर नंदी देखील विराजमान आहे. तपोवनातील रहिवासी या मंदिरात रोज नित्यानं पूजा करतात.

तपोवनमध्ये असणारं जपानी शैलीतल्या मंदिराची ज्यांना माहिती आहे असे अनेक जण मुंबई, पुण्यातून देखील खास मंदिर पाहायला येतात. श्रावण महिन्यात तपोवन परिसरालगत असणाऱ्या भागातील भाविक देखील आता पूजेसाठी यायला लागलेत. जपानी शैलीत उभारण्यात आलेलं हे आगळं - वेगळं मंदिर महाराष्ट्रात एकमेवच असावं असं प्रा. डॉ. सुभाष गवई यांनी सांगितलं.